RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.१६ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जम्मू-काश्मीरसह हरियाणातील निवडणूक तारखांची घोषणा

### ४ ऑक्टोबर रोजी दोन्ही राज्यांतील होणार मतमोजणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ नवी दिल्ली**

केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेत आज जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली आहे. जम्मू काश्मीरमधील निवडणुका तीन टप्प्यांमध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान १८ सप्टेंबर रोजी, दुसऱ्या टप्प्यातील मतदान २५ सप्टेंबर आणि तिसऱ्या टप्प्यातील मतदान १



ऑक्टोबर रोजी होणार आहे. तर हरियाणातील निवडणुका एकाच टप्प्यात होणार असून १ ऑक्टोबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडेल आणि ४ ऑक्टोबर रोजी दोन्ही राज्यांतील मतमोजणी करण्यात येणार आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर करताना मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, जम्मू काश्मीरमध्ये १० वर्षांनंतर निवडणुका होणार असून एकूण ९० जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये जम्मूतील ४३ आणि काश्मीरमधील ४७ जागांचा समावेश असणार आहे. निवडणूक आयोगाने जम्मूमधील सांबा, कठुआ, राजौरी, किश्तवाड, डोडा आणि उधमपूर या भागातील एक-एक जागा वाढवण्यात आली असून काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यात एक विधानसभा मतदारसंघ वाढवण्यात आला आहे, अशी माहिती कुमार यांनी दिली आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत जम्मू काश्मीरमध्ये मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. मतदानासाठी मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या. जम्मू काश्मीरमधील लोकांना चित्र बदलायचे असून ते निवडणुकांसाठी उत्सुक असल्याचं दिसत आहे, असंही राजीव कुमार म्हणाले.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

### अमरावतीच्या बहिणीने साधला मुख्यमंत्र्यांशी संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' या अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील जवळपास ३ लक्ष ९५ हजार बहिणींची ऑनलाईन नोंदणी झाली असून ह्या सर्व बहिणी प्रतिमहा पंधराशे रुपये लाभासाठी पात्र आहेत. यासाठी काल दि. १५ ऑगस्ट या स्वातंत्र दिनाच्या पार्श्वभूमीवर सायंकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील सर्व लाडक्या बहिणीशी सुसंवाद साधला. त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील रंजना हिरुळकर या बहिणीने मुख्यमंत्री महोदय यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत तीन हजार रुपये मिळाल्यामुळे बोलीभाषेमध्ये मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून याबाबत आभार व्यक्त केले.




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण चार लक्ष लाभार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३ लक्ष ९५ हजार लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर झाले असून या लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये प्रतिमहा १ हजार ५०० रुपये याप्रमाणे ३ हजार रुपयांचा पहिला हप्ता एकत्रितरित्या जमा झाला. यामुळे जिल्ह्यामध्ये उत्साहाचे वातावरण आहे.महाराष्ट्रातील सर्व लाडक्या बहिणीशी संवाद साधता यावा म्हणून मुंबई येथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल आभासी पद्धतीने सर्व बहिणीशी संवाद साधला. यामध्ये अमरावतीतून रंजना हिरुळकर या लाभार्थी महिलेने मुख्यमंत्री महोदयांशी थेट संवाद साधत आपल्याला या योजनेतून जो निधी मिळाला आहे त्याचा कसा उपयोग करण्यात येणार आहे, आणि हा निधी आपल्यासाठी किती उपयुक्त आहे, या योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यास कसे सहाय्य होईल याबाबत मनमोकळेपणे बोलून आपले मनोगत व्यक्त केले. या योजनेमुळे महिलांना कुटुंबासाठी निर्णायक भुमिका घेताना आर्थिक सहाय्य होईल याबाबत सविस्तर संवाद साधला.मुख्यमंत्री यांनीही यावेळी या लाडक्या बहिणीचे कौतुक करत भाऊ म्हणून सदैव बहिणींच्या पाठीशी राहण्याचे आश्वासन दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलास घोडके, बाल विकास प्रकल्प अधिकारी नवनाथ घनतोडे, नांदगाव पेठच्या सरपंच श्रीमती कविता डांगे, श्रीमती दीपा शास्त्रकार, श्रीमती प्रिया खवले अंगणवाडी सेविका माया पिसाळकर, श्रीमती अर्चना मोरे, श्रीमती सीमा गडले, श्रीमती किरण उगले यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

## अमरावतीसह समाजवादी पार्टीने महामहाविकास कडे केली १२ जागांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या आघाडीने दणदणीत यश मिळवलं. याठिकाणी ८० पैकी ३७ जागा जिंकून समाजवादीनं चांगली कामगिरी केली. आता आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने सपाने महाराष्ट्रावर लक्ष केंद्रीत केले आहे. महाराष्ट्रात सपाने १२ जागांची मागणी केली असून काँग्रेस आणि महाविकास आघाडी पक्षाला जागा सोडतील अशी आशा सपाच्या नेत्यांना आहे.

सपाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी काँग्रेस नेतृत्वाकडे याआधीच यादी पाठवली आहे. राज्यात भाजपा विरोधी मतांमध्ये विभाजन




टाळण्यासाठी समाजवादी पक्षानं मविआकडे १२ जागांची मागणी केली आहे. समाजवादी पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळवण्यासाठी नेते प्रयत्नशील आहेत असं महाराष्ट्र समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आमदार अबु आझमी यांनी म्हटलं आहे.

समाजवादी पक्षाने रावेर, अमरावती जागेवरही दावा केला आहे ज्याठिकाणी सध्या काँग्रेसचे विद्यमान आमदार आहेत. त्याठिकाणी अल्पसंख्याकांची मते आणि सरकारविरोधी मते त्याचा फायदा पक्षाला होऊ शकतो असं सपा नेत्यांना वाटतं. त्याशिवाय मानखुर्द-शिवाजीनगर, भिवंडी पूर्व, भिवंडी मध्य, मालेगाव मध्य, भायखळा, वर्सोवा, धुळे, औरंगाबाद पूर्व, अनुशक्तीनगर आणि कारंजा या विधानसभा मतदारसंघाची मागणी समाजवादी पक्षाने केली आहे.गेल्या काही महिन्यांपासून समाजवादी पार्टीने अमरावती विधानसभा मतदार संघ लक्ष करीत त्या ठिकाणी पक्ष संघटन वाढविणे ,नवीन कार्यकर्ते जोडणे ,आंदोलने करणे सामान्य माणसांच्या प्रश्नांवर आवाज उचलणे या बाबींकडे अधिक लक्ष दिले आहे. त्यामुळे आता महविकास आघाडीत अमरावती बाबत काय निर्णय होतो त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## सरसंघचालक प्रथमच मुक्कामी दौऱ्यावर, संघ वर्तुळात...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६वर्धा**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत प्रथमच वर्ध्यात मुक्कामी येत आहेत. आज शुक्रवार ते उद्या शनिवारी सकाळी ते गाठीभेटी घेणार आहे. त्यांचा दौरा नेहमी शिस्तीत व गोपनीय स्वरूपात व प्रसिद्धी माध्यमापासून दूर ठेवल्या जाण्याचा शिरस्ता आहे. प्राप्त माहितीनुसार मोहन भागवत हे नागपुरातून थेट वर्ध्यात हिरामण पारिसे या ज्येष्ठ स्वयंसेवकाकडे जातील. तिथे उपवासाचा फराळ करणार. येथे कुणाशीही भेटणार नाही. त्यानंतर ते नालवाडी परिसरातील अक्षय शिंगरूप यांच्याकडे जाणार आहेत. येथे ६५ वर्षांवरील ज्येष्ठ स्वयंसेवकांशी ते चर्चा करतील. निवडक जणांना निमंत्रण आहे. या ठिकाणी त्यांचा चार तास मुक्काम आहे. पुढे ५ वाजता भगतसिंग सायंशाखेस ते भेट देतील. बाल ते युवा गटातील



सेवकांशी संवाद साधणार. नंतर गटशिक्षक व गटनायक यांच्याशी चर्चा करतील.

सध्या संघाच्या सायं शाखा बंद पडत आहे. त्यामुळे शिशु, बालक यांना संस्कारीत करण्याचे काम मंदावले असल्याची खंत सेवक व्यक्त करीत असतात. संघाशी नाते सांगत मग मोठे झाल्यावर केवळ कामापुरते येतात. बालपण मोबाईल विश्वात हरवीत चालले आहे. त्यामुळे या सायं शाखा बळकट करण्याची गरज जुने जाणते सेवक व्यक्त करीत असतात. त्या संदर्भात मोहन भागवत हे उदबोधन करणार असल्याचे समजले. हा कार्यक्रम आटोपल्यावर भागवत हे पुन्हा शिंगरूप यांच्याकडे मुक्कामासाठी जाणार असू कुणाशीही भेट होणार नसल्याचे समजते. शनिवारी १७ ऑगस्टला सकाळी देशमुख लॉन येथे ते प्रवासी स्वयंसेवकशी चर्चा करतील. प्रामुख्याने प्रभात शाखेत कार्यरत या ठिकाणी सहभागी होणार आहे. शिंगरूप यांनी यांस पुष्टी दिली.कुठलाच कार्यक्रम खुला नसून केवळ आमंत्रित असलेलेच भेट घेऊ शकतील.

## उद्धव ठाकरेंनी जाहीर केली मराठा आरक्षणावरील भूमिका; केंद्राच्या कोर्टात ढकलला चेंडू!

### तुम्ही मराठा आरक्षणासाठी विधेयक आणा, आम्ही पाठिंबा देऊ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून धुमसत असलेल्या मराठा आरक्षणाच्या प्रश्नामुळे सर्वच राजकीय पक्षांची कोंडी झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी सभा घेण्यासाठी गेल्यानंतर राजकीय नेत्यांना घेराव घालत आंदोलकांकडून मराठा आरक्षणाबाबतची भूमिका जाहीर करण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आज झालेल्या महाविकास आघाडीच्या मेळाव्यातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी



आपली भूमिका जाहीर केली असून संसदेत तुम्ही मराठा आरक्षणासाठी विधेयक आणा, आम्ही पाठिंबा देऊ, असं आवाहन त्यांनी सत्ताधाऱ्यांना केलं आहे.


मराठा आरक्षणाबाबत भूमिका जाहीर करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रात तुम्ही मराठा, ओबीसी, धनगर अशी समाजासमाजात आग लावली आहे. माझी तर स्पष्ट भूमिका आहे आणि शरद पवारांसह काँग्रेसनेही याबाबत स्पष्टपणे सांगितलं आहे. आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा अधिकार राज्य सरकारला नसून केंद्र सरकारला आहे. काही दिवसांपूर्वी बिहारने वाढवलेली आरक्षणाची मर्यादा सुप्रीम कोर्टाने उडवून लावली आहे. हा अधिकार फक्त आणि फक्त लोकसभेला आहे. अन्यथा राष्ट्रपती हे करू शकतात. सर्वोच्च न्यायालयाचा अहवाल घेऊन आणि त्यांचा सल्ला घेऊन हे केलं जाऊ शकतं. त्यामुळे तुम्ही संसदेत मराठा आरक्षणासाठी एकूण आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचं विधेयक संसदेत आणा, धनगर समाजालाही आरक्षण द्या, आम्ही महाविकास आघाडी म्हणून या विधेयकाला पाठिंबा देऊ, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, सत्ताधाऱ्यांकडून हिंदू-मुस्लिमांमध्ये, मराठी-मराठेत्तरांमध्ये आणि जाती-जातींमध्ये आगी लावण्याचं काम सुरू आहे. या आगींवर स्वतःच्या पोळ्या भाजण्याचं त्यांचं काम सुरू आहे. त्यामुळे आम्ही तुम्हाला गाडल्याशिवाय राहणार नाही, असा हल्लाबोलही उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

## १०० कोटी वसुली प्रकरणात सचिन वाझेला मिळणार जामीन?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ मुंबई**

शंभर कोटी रुपयांच्या खंडणी वसुली प्रकरणात बडतर्फ पोलिस अधिकारी सचिन वाझे याने ९ मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला आहे. त्याच्या जामीन अर्जावर सुनावणी पूर्ण झाली असून न्या. भारती डांगरे यांचे खंडपीठ २३ ऑगस्टला राखून ठेवलेला निकाल जाहीर करणार आहे.



सचिन वाझे याच्याविरोधात १०० कोटी वसुली प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडणी प्रकरणात अनिल देशमुख यांच्याविरोधात माफीचा साक्षीदार बनण्याची तयारी दर्शवली होती; मात्र ईडीने याला विरोध दर्शविला होता. वाझे याने मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी ज्येष्ठ वकील आबाद पोंडा व ॲड. रोनक नाईक यांच्यामार्फत अर्ज दाखल केला.या अर्जावर न्या. भारती डांगरे आणि न्या. मंजूषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी ॲड. पोंडा यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, वाझे दोन वर्षांपासून तुरुंगात असून अद्याप खटल्याला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे त्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे. सरकारने मात्र त्याच्या अर्जाला विरोध केला आहे. न्यायालयाने दोन्ही बाजूंकडील युक्तिवाद ऐकून घेत निकाल राखून ठेवला. न्यायालय हा निकाल २३ ऑगस्टला जाहीर करणार आहे.

## 'वाळवी' ठरला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट, ३ मराठी सिनेमांची राष्ट्रीय पुरस्कारावर छाप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. दरवर्षी सर्व भाषांमधील सर्वोत्कृष्ट सिनेमांना राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येतं. राष्ट्रपतींच्या हस्ते हे पुरस्कार दिले जातात. गेल्या वर्षी एकदा काय झाले या मराठी सिनेमाला सर्वोत्कृष्ट मराठी सिनेमाचा पुरस्कार मिळाला होता. यंदा सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटासाठी 'वाळवी'




या सिनेमाची निवड करण्यात आली आहे. 'आणखी एक मोहेनजोदारो' या सिनेमाला बेस्ट बायोग्राफिकल हिस्टोरिकल कम्पायलेशन फिल्म कॅटेगरीत अवॉर्ड मिळाला आहे.

परेश मोकाशी यांचं दिग्दर्शन असलेल्या 'वाळवी' सिनेमाला यंदाचा राष्ट्रीय पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. यंदाच्या राष्ट्रीय पुरस्कार चित्रपटांमध्ये तीन मराठी सिनेमांनी बाजी मारली आहे. 'वाळवी'बरोबरच आणखी दोन मराठी सिनेमांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. 'मरमर्स ऑफ द जंगल' या मराठी सिनेमाला बेस्ट डॉक्युमेंटरी फिल्मचा अवॉर्ड मिळाला आहे. 'वारसा' या माहितीपटालाही राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

दरम्यान, 'वाळवी' हा सिनेमा १३ जानेवारी २०२३ मध्ये प्रदर्शित करण्यात आला होता. स्वप्निल जोशी, शिवानी सुर्वे, अनिता दाते, सुबोध भावे अशी या सिनेमाची स्टारकास्ट होती. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई केली होती.

## इस्रो ने इतिहास रचला, EOS-08 चे यशस्वी प्रक्षेपण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६श्रीहरीकोटा**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने आज पुन्हा एकदा इतिहास रचला. इस्रोने भारताच्या Earth Obrervation Satellite (EOS-08) चे आज (दि.१६) सकाळी ९.१७ वाजता यशस्वी प्रक्षेपण केले.भारतीय अंतराळ संशोधन संस्था)ने SSLV-D3/EOS-08 मोहिमेतील तिसरे आणि अंतिम विकासात्मक उड्डाण आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरुन प्रक्षेपित केले. या उपग्रह लहान आकारचा असला तरी ते अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित



आहे. उपग्रह निर्मितीमधील विशेष करून मेनफ्रेममधील बदल यात झालेले आहेत. या उपग्रहाचे वजन फक्त १७५.५ किलो इतके कमी आहे आणि तसेच तो पृथ्वीपासून ४७५ किलोमीटर इतक्या अंतरावर ते कार्यरत राहणार आहे.

या उपग्रहाला रात्री आणि दिवसाही पृथ्वीचे फोटो घेता येणे शक्य होणार आहे. यामध्ये चळव थर्रीश आणि डेपस थर्रीश या दोन इन्फ्रारेड बँडच्या मदतीने पृथ्वीचे फोटो घेणे शक्य होणार आहे. ज्या गोष्टी गरम आहेत, त्या शोधण्याची क्षमता या Pload मध्ये आहे, म्हणजे वणवा, ज्वालामुखी उद्रेक, हवामानातील बदल हा उपग्रह चांगल्या प्रकारे टिपू शकणार आहे. हा उपग्रह समुद्राचा अभ्यास करण्यासाठी विशेष उपयोगी ठरणार आहे. तसेच जमिनीतील आर्द्रता, हिमालयातील क्रायोस्पेअर याचा अभ्यास करण्याची क्षमता यात आहे. SiC UV Dorimeter - सूर्यापासून येणारी अतिनील किरणे, गॅमा उत्सर्ग याचा अभ्यास करेल. या झरूश्रेवचा वापर गगनयान मोहिमेत होणार आहे.

## संपादकीय ......

# सामर्थ्यशाली भारतासाठी!

ब्रिटिशांच्या गुलामगिरीची राजवट उलथवून टाकत स्वतंत्र भारत म्हणून जागतिक अवकाशात भारताचा उदय झाला, त्याला आज ७७ वर्षे पूर्ण होत आहेत. तथापि, आजची स्थिती पाहिल्यास समाजातील विविध वर्गांमधील, जात समूहांमधील, धर्मांमधील असमानता ही विग्रह निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहे. ती दूर करायची असेल, तर गरिबांना आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना जीवन जगणे सुकर ठरेल आणि सर्वांना समान संधी मिळतील, अशी धोरणे शासनकर्त्यांना राबवावी लागतील.

प्रदीर्घ आणि प्रचंड संघर्षानंतर ब्रिटिशांच्या जुलमी, अन्यायी, अत्याचारी राजवटीतून १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाला आणि १९५० मध्ये प्रजासत्ताक देश म्हणून भारताने जागतिक अवकाशात पाऊल ठेवले. भारतीय स्वातंत्र्य हे केवळ कोट्यवधी भारतीयांसाठीच नव्हे, तर समस्त आशिया खंडासाठी आणि जगासाठी प्रेरणादायी होते. असे असताना आज आपल्याच देशातील अनेक जण या स्वातंत्र्याची महती आणि मोल विसरत चालल्याचे दिसत आहे. इतकेच नव्हे, तर हजारो क्रांतिकारकांच्या बलिदानातून मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोगही करताना दिसत आहेत. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी किंवा एखाद्या निर्णयाला विरोध दर्शवण्यासाठी आज असे मार्ग अवलंबले जातात, जे १९४७ च्या पूर्वी ब्रिटिशांच्या विरोधात अवलंबले जात असत. रेल्वे रोखणे, चक्का जाम करणे, समूहांद्वारे तोडफोड करून दहशत पसरवणे यांसारख्या निषेधाच्या किंवा आंदोलनांच्या मार्गाला लोकशाही म्हणता येणार नाही. ब्रिटिशांविरोधातील आंदोलनामध्ये ही पद्धत योग्य होती. कारण, इंग्रज हे स्वकीय नसून परकीय होते.

सातासमुद्रापारच्या देशातून येऊन त्यांनी आपल्या देशावर कब्जा मिळवला होता; पण १९४७ नंतरचा भारत हा आपला देश आहे. भारतीयांचा देश आहे. अशा देशात झुंडशाहीच्या मार्गाने विरोध करण्याची ही पद्धत देशाला मागे घेऊन जाणारी आहे. यातून देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये, आर्थिक विकासामध्ये आपण अडथळे आणत राहिलो, तर त्यातून होणारे नुकसान हे अंतिमतः आपलेच असणार आहे. आपल्या अधिकारांसाठी आंदोलन करणे गैर नाही. लोकशाहीने प्रत्येकालाच शांततापूर्ण मार्गाने, कायद्याच्या, नियमांच्या चौकटीत राहून राजकीय व्यवस्थेकडे आपल्या मागण्या करण्याचा आणि त्यामध्ये दिरंगाई झाल्यास आंदोलन करण्याचा अधिकार दिलेला आहे; पण या अधिकारांबाबत जागरूक असलेल्या समाजाने भारतीय नागरिक म्हणून असणारी आपली कर्तव्ये कोणती आहेत, याविषयीही जाणून घेतले पाहिजे. आज स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्षे पार करून पुढे निघालेल्या भारतात स्वातंत्र्याबाबत, अधिकारांबाबत सर्वच जण सक्रिय आहेत; पण कर्तव्यांबाबत तितक्या प्रमाणात जागरूकता दिसत नाही. आपल्या निदर्शनांनी अन्य व्यक्ती, समाज आणि देश यांचे कोणतेही नुकसान होता कामा नये. नियमांच्या चौकटीतूनच आपल्या मागण्या मागितल्या गेल्या पाहिजेत.

दुसरी गोष्ट म्हणजे, आज मोठ्या प्रमाणावर नागरिक प्रतिष्ठित व्यक्तींविषयी सत्य माहिती जाणून न घेता फेक न्यूज किंवा खोट्या माहितीवर आधारित बेतालपणाने बोलताना दिसतात. ही बाब चिंताजनक आहे. अशा कृत्यांना आणि समाजातील वाढत्या गुन्हेगारीला रोखण्यासाठी आपल्याला कायदेव्यवस्था कठोर करण्याची गरज आहे. तिसरा मुद्दा आहे सामाजिक समानतेचा. चौथा मुद्दा आहे, लोकसंख्येचा! चीनला मागे टाकून भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनला आहे. प्रचंड मोठी लोकसंख्या हे भारतासाठी एक मोठे आव्हान आहे. आदर्श स्थितीचा विचार करता आपल्या देशाची लोकसंख्या आटोक्यात असावयास हवी; पण आज ती १४० कोटींच्या वर पोहोचली आहे. ती नियंत्रित करण्यासाठी आपल्याला आता पावले उचलावीच लागतील. त्याचबरोबर या लोकसंख्येचा कुशल मनुष्यबळ म्हणून योग्य दिशेने वापर होण्यासाठी योजना बनवाव्या लागतील.

आज विकसनशील भारताकडून विकसित भारताकडे निघालेल्या देशामध्ये काही तत्त्वांकडून षड्यंत्रेही रचली जात आहेत. या तत्त्वांचा कठोरपणाने निपटारा करावा लागेल. आपण यासंदर्भात चीन आणि पाकिस्तान या देशांची नावे घेत असतो. यामध्ये नवीन काहीच नाही. वर्षानुवर्षांपासून हे दोन्हीही देश भारताविरुद्ध शत्रुत्व बाळगून आहेत आणि आपल्या प्रगतीला खीळ बसावी, यासाठी सातत्याने कटकारस्थाने रचत आली आहेत; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची चिंतेची बाब आहे, ती म्हणजे आपल्याच देशातील काही घटक या कारस्थानांमध्ये सहभागी होत आहेत. त्यांच्यावर अत्यंत कटाक्षने नजर ठेवावी लागणार आहे आणि त्यांना जगासमोर आणावे लागणार आहे. एकंदरीत, देशाच्या प्रगतीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक नागरिकांनी एखाद्या सैनिकासारखी भूमिका पार पाडली पाहिजे. आपल्या सभोवताली कोणतीही गोष्ट राष्ट्रीय हिताला बाधा आणणारी दिसल्यास त्याबाबत पोलिस प्रशासनाला कल्पना दिली गेली पाहिजे. देशाच्या सुरक्षिततेबाबत आपल्याला चोवीस तास सजग राहण्याची गरज आहे. राजकीय पक्षांनी राष्ट्रनिर्माणासाठी, प्रगतिशाली राष्ट्राची उभारणी करण्यासाठी सार्थ भूमिका बजावण्याची गरज आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश जाण्यास मदत होईल. सर्वांना शिक्षण आणि नोकरीच्या समान संधी संघर्षाविना मिळाल्यास आणि चांगले जीवनमान जगता येण्यास पोषक स्थिती निर्माण झाल्यास भारताला सामर्थ्यवान राष्ट्र बनण्यापासून कोणीही अडवू शकणार नाही.

# मित्रकिडी कीड नियंत्रणात नेमक्या कशा काम करतात वाचा सविस्तर




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती** – 'जीवो जीवश्चः जीवम्' या युक्ती प्रमाणे एक सजीव दुसऱ्या सजीवावर उपजीविका करतो. निसर्गात किडींनादेखील शत्रू असतात मित्रकीटकांच्या वापराद्वारे जैविक कीडनियंत्रण ही शाश्वत शेतीची गुरुकिल्ली आहे.

जैविक घटकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि पुरवठा करणे हीदेखील तेवढीच महत्त्वाची बाब आहे. प्राणीजगतात कीटकांचा वर्ग फार विशाल आहे. त्यात जशा हानिकारक किडी आहेत तसेच उपयुक्त कीटकही अनंत आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

अशा उपयुक्त जैविक नियंत्रणामध्ये योगदान देणाऱ्यांची संख्या मोठी आहे. हानिकारक व मित्रकीटक यांच्यातील गफलत टाळण्यासाठी त्यांची आपल्याला ओळख असणे आवश्यक आहे.

**परोपजीवी किडे**– हे किडे आपल्या आयुष्याचा बराचसा काळ दुसऱ्या किड्यांच्या अंगावर किंवा त्यांच्या शरीरात घालवतात.

– हे किडींच्या शरीरात किंवा शरीरावर अंडी घालतात.

– त्यातुन निघालेल्या अळ्या भक्ष्य किडीला खातात त्यामुळे ते पिकांसाठी त्रासदायक मोठ्या किडींवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपयोगाचे ठरतात.

– परोपजीवी किडे त्यांच्या भक्ष किडीहून आकाराने खुप लहान असल्यामुळे आणि त्यांची अंडी व बाल्यावस्था भक्ष्य किडींच्या शरीरात असल्यामुळे केवळ बघुन त्यांना ओळखण कठीण जात.

**परभक्षी मित्र किडे**– हे किडे इतर लहान किंवा पूर्ण वाढ झालेल्या किड्यांना खातात.

– परभक्षी किडे आकाराने त्यांच्या भक्ष्य किडींपेक्षा मोठे असतात.

– किडीवरील सूक्ष्म रोगजंतू काही सूक्ष्मजंतू जसे जीवाणू, विषाणू, बुरशी इत्यादी कीटकांना रोगग्रस्त करतात, त्यामुळे ते कीटक मारतात.

– जैविक नियंत्रणासाठी उपयोगी असणारे निवडक परोपजीवी, भक्षक कीटक, जीवाणू आणि विषाणू प्रयोगशाळेत वाढविता येतात.

– क्रायसोपा व लेडीबर्ड बीटल या भक्षक कीटकांचा, एच.ए.एन.पी.व्ही विषाणूचा व बीटी या जीवाणूचा वापर करता येईल.

**मित्र कीटकांचे जतन**– शेताच्या कडेने फुलांची पिके लावणे मित्र कीटकांना आकर्षित करण्यासाठी सुर्यफुल, चवळी, झेंडु यासारखी पिवळ्या फुलांची झाडे लावावीत.

– पिवळ्या व पांढऱ्या फुलांच्या पिकांच्या ओळीमुळे मित्र कीटकांची संख्या काही पटींनी वाढल्याचे लक्षात आले आहे.

– कृषि विद्यापीठ, संशोधन संस्थांमार्फत मित्र किटक प्राप्त करुन शेतात सोडावेत.

– सुरुवातीलाच घातक कीटकनाशकांच्या फवारणीमुळे मित्र कीटक पण मारली जातात.

– निंबोळी अर्क व दशपर्णी अर्क फवारणीमुळे मित्र कीटकांवर ऐवढा अनिष्ट परिणाम होत नाही.




# कमी प्रमाणात मद्यपान केल्यानेही वाढू शकतो कर्करोग होण्याचा धोका?

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

मध्यम प्रमाणात मद्यपान करणे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, असे म्हटले जायचे. पण, आता या अनेक वर्षांपासून चालत आलेल्या विश्वासाला एका नवीन अभ्यासाने आव्हान दिले आहे. संशोधकांना आढळून आले की, कमी प्रमाणातील मद्यपानही वृद्धांमध्ये कर्करोगाची लक्षणे वाढवते.६० आणि त्याहून अधिक वयाच्या १,३५,००० लोकांवरील १२ वर्षांच्या अभ्यासात हृदयविकाराच्या मृत्यूंच्या संख्येवर मध्यम मद्यपानाचा कोणताही चांगला प्रभाव दिसून आला नाही. या अभ्यासातील अल्कोहोल संशोधन प्रतिमान बदलणाऱ्या पुराव्याच्या वाढत्या भागामध्ये योगदान देतो. पूर्वीच्या अभ्यासात जाणवलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी नवीन पद्धती वापरल्या जात आहेत आणि त्यात अल्कोहोल पिण्याचे फायदे सुचवले होते. संशोधनात मध्यम आणि अधूनमधून मद्यपान करणाऱ्यांची तुलना मद्यपान न करणाऱ्यांशी करण्यात आली. त्यात आजारपणामुळे मद्यपान करणे थांबवले आहे अशा व्यक्तींचाही समावेश असू शकतो, जे पूर्वीचे परिणाम कमी करू शकतात.

हा अभ्यास अशा वेळी आला आहे की, ज्यावेळी अल्कोहोलच्या सेवनावरील यूएस मार्गदर्शक तत्त्वांचे पुनरावलोकन केले जात आहेत. दोन वैज्ञानिक गट यूएस आहारविषयक मार्गदर्शक तत्त्वांचा अहवाल तयार करीत आहेत. एक गट आरोग्य एजन्सीच्या प्रतिनिधींसह एक आंतर–सरकारी उपसमिती आहे; तर दुसरा ज्याला काँग्रेसद्वारे निधी देण्यात आला आहे, जो नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस, इंजिनियरिंग आणि मेडिसिनद्वारे आयोजित केला जातो.

सुरुवातीला हार्वर्ड मेडिकल स्कूलच्या शिक्षणाशी संलग्न असलेल्या बेथ इस्रायल डेकोनेस मेडिकल सेंटरमधील डॉ. केनेथ मुकामल यांना एका समितीमध्ये नामांकित करण्यात



आले होते. त्यांनी अल्कोहोल उद्योगाकडून निधी मागितल्याचे उघड झाल्यानंतर २०१८ मध्ये मध्यम मद्यपानावरील १०० मिलियनची चाचणी थांबवण्यात आली. छ–डएच् ने त्यांचे नामांकन मागे घेतले; परंतु त्यांच्या जागी उद्योगांशी संबंधित असलेल्या हार्वर्ड शास्त्रज्ञाची नियुक्ती करण्यात आली.

अल्कोहोलचे कमी प्रमाणात सेवन केल्याने आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो, तसेच जास्त मद्यपान केल्यामुळे जास्त हानी होते. जे वृद्ध कमी प्रमाणात मद्यपान करायचे आणि ज्यांना आरोग्य जोखमीचा सामना करावा लागतो, वाइन पिणे आणि फक्त जेवणाबरोबर अल्कोहोलचे सेवन केल्याने कर्करोगाच्या मृत्यूचा धोका कमी होतो. याची कारणे पूर्णपणे स्पष्ट नाहीत.त्यामुळे तुम्ही जर दररोज मद्यपान करीत असाल, तर पुरुषांसाठी दररोज २० ते ४० ग्रॅम आणि महिलांसाठी १० ते २० ग्रॅम घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हे सर्व कारणांमुळे आणि कर्करोगामुळे मृत्यूच्या उच्च जोखमीशी संबंधित होते. जास्त मद्यपान हे कर्करोग आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगाशी संबंधित होते.

# देशभरातील ३९ पोस्टल सर्कल्समध्ये 'ग्रामीण डाक सेवक' पदांची भरती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती** – इंडिया पोस्ट (मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन) देशभरातील ३९ पोस्टल सर्कल्समध्ये 'ग्रामीण डाक सेवक' पदांची भरती. एकूण रिक्त पदे – ४४,२२८. महाराष्ट्र पोस्टल सर्कल अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण डाक सेवक ब्रँच ऑफिसेसमध्ये 'ब्रँच पोस्ट मास्टर 'असिस्टंट ब्रँच पोस्ट मास्टर च्या एकूण ३,१७० पदांची भरती. (अजा – २८०, अज – २९९, इमाव – ७००, ईडब्ल्यूएस – ४०६ दिव्यांग – ए – ३६, बी – ३८, सी – ३०, डी ई – १६, खुला – १,३६५)

**पदनिहाय कामाचे स्वरूप :**

**(१) ब्रँच पोस्टमास्टर** : ग्रामीण डाक सेवक ब्रँच पोस्ट ऑफिसचे काम सांभाळणे. इंडिया पोस्ट्स पेमेंट्स बँक (खझझइ) चे काम सांभाळणे आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावातील/ ग्रामपंचायती मधील पोस्टाचा व्यवसाय सांभाळणे ब्रँच पोस्ट मास्टर हा ग्रामीण डाक सेवक ब्रँच ऑफिसचा प्रमुख असणार.

**(२) असिस्टंट ब्रँच मास्टर** : स्टँप/स्टेशनरी यांची विक्री, एकूण टपालाची वाहतूक व वितरण, कढढइ च्या कामात व पोस्टाच्या इतर कामात ब्रँच पोस्ट मास्टरना मदत करणे.

पात्रता : दि. १२ जुलै २०२४ रोजी सर्व पदांसाठी –

(i) १० वी (एसएससी) उत्तीर्ण (गणित, स्थानिय भाषा आणि इंग्रजी विषयांसह).

(ii) पोस्टल सर्कलसाठी नेमलेली ऑफिशियल लँग्वेज उमेदवारांना अवगत असणे आवश्यक.

महाराष्ट्र पोस्टल सर्कलमधील महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी ऑफिशियल लँग्वेज मराठी आहे. एकूण रिक्त पदे – ३,०८३ व कोंकणी/मराठीसाठी एकूण रिक्त पदे – ८७. (गोवा राज्यासाठी) कर्नाटक – १,९४० पदांसाठी कन्नड, मध्य प्रदेश – ४,०११ पदांसाठी हिंदी, गुजरात – २,०३४ पदांसाठी गुजराती.

(iii) उमेदवारांनी डिपार्टमेंटल सॉफ्टवेअरवर काम करण्यासाठी कॉम्प्युटर/ लॅपटॉप/ झजड/ मोबाइल इ. चालविण्याचे पुरेसे ज्ञान असल्याचे घोषणापत्र –पपर्शीश–तख मधील नमुन्यात दाखल करणे आवश्यक आहे.

(iv) उमेदवारांना सायकल चालविता येणे बंधनकारक आहे. सायकल ऐवजी स्कूटर/ मोटर सायकल चालविता येत असेल तरी चालेल. यासाठी उमेदवारांनी –पपर्शीश– तखख मधील घोषणापत्र सादर करणे आवश्यक.

(v) उमेदवारांनी उपजीविकेसाठी पुरेशी साधनं उपलब्ध असल्याबाबतचं घोषणापत्र annexure- VIII मध्ये द्यावयाचे आहे.

(vi) तसेच ऑनलाइन अर्जात दिलेली माहिती खरी असल्याबाबतचं घोषणापत्र annexure- IX मध्ये सादर करावयाचे आहे.

(vii) उमेदवारांनी –पपर्शीश–त मध्ये दिलेल्या नमुन्यातील दाखले सादर करणे आवश्यक.

(viii) उमेदवारांनी -nnexure- IV मध्ये दिलेल्या नमुन्यातील घोषणापत्र सादर करणे आवश्यक.

वयोमर्यादा : दि. ५ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे.




टाईम रिलेटेड कंटीन्यूइटी अलाऊन्स महागाई भत्ता : ब्रँच पोस्ट मास्टर्स यांना दरमहा रु. १२,००० – २९,३८० व ABPM²/ डाक सेवक यांना रु. १०,००० – २४,४७० TRCA दिले जातील.

**अर्जाचे शुल्क** : रु. १००/– (खुलागट, इमाव, ईडब्ल्यूएस). (निवडलेल्या डिव्हिजनमधील सर्व पदांच्या पसंतीसाठी) महिला/ अजा/ अज/ विकलांग उमेदवारांना शुल्क माफ आहे.

**निवड पद्धती** : इ. १० वी (एसएससी) मधील गुणवत्तेनुसार आणि उमेदवारांनी पदांसाठी दिलेल्या पसंतीक्रमाप्रमाणे निवड केली जाईल. समान गुण असल्यास जन्म तारखेनुसार (वयाने मोठा), अज–ट्रान्सवुमन, अज–महिला, अजा–ट्रान्सवुमन, अजा–महिला, इमाव–ट्रान्सवुमन, इमाव–महिला, ईडब्ल्यूएस–ट्रान्सवुमन, ईडब्ल्यूएस–महिला, खुलागट–ट्रान्सवुमन, खुलागट–महिला, अज–ट्रान्समेल, अज–पुरुष, अजा–ट्रान्समेल, अजा–पुरुष, इमाव–ट्रान्समेल, इमाव–पुरुष, ईडब्ल्यूएस–ट्रान्समेल, ईडब्ल्यूएस–पुरुष, खुलागट–ट्रान्समेल, खुलागट–पुरुष या क्रमाने प्राधान्य दिले जाईल. अंतरिम निवड यादीनुसार उमेदवारांना (annexure- IX मध्ये नमूद केलेले) हमीपत्र सादर करावे लागेल. त्यानंतर उमेदवारांना कागदपत्र पडताळणी साठी बोलाविले जाईल. निवड प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण केली जाईल.उच्च गुणवत्ता धारण करणाऱ्या उमेदवारांना कोणतेही प्राधान्य देण्यात येणार नाही.

उमेदवार रजिस्ट्रेशन नंबर आणि जढझ देवून अर्ज करण्यासाठी फक्त एकच डिव्हिजन निवडू शकतात. https:// indiapostgdsonline. gov. in वेबसाईटच्या होमपेजवर "ru Maharashtra' वर क्लिक करून डिव्हिजन निवडल्यानंतर त्या डिव्हिजनमधील पात्र पदांची यादी ' View Posts' वर क्लिक केल्यावर स्क्रीनवर डिस्प्ले होईल, त्यानुसार उमेदवारांनी पदांचा पसंतीक्रम द्यावयाचा आहे. ज्या पदासाठी उमेदवाराने पसंतीक्रम दिलेला नाही त्या पदासाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी आपले नाव https:// indiapostgdsonline. gov. in या पोर्टलवर रजिस्टर करावयाचे आहे. ऑनलाईन अर्ज करताना उमेदवारांनी आवश्यक ती कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे. (१) फोटो (jpg/ jpeg format upto 50 kb), (2) ghr (jpg/ jpeg format upto 20 kb).

ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर ३ दिवस म्हणजे ६ ते ८ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्जात काही बदल करावयाचा असल्यास Correction Window उपलब्ध असेल.ऑनलाईन अर्ज https:// indiapostgdsonline. gov. in/ या संकेतस्थळावर दि. ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत करावेत. रजिस्ट्रेशन आणि ऑनलाईन अर्ज कसा करावा याचा तपशील इंडिया पोस्टच्या वेबसाईटवरील जाहिरातीमधील annexure- II मध्ये उपलब्ध आहे.

**महाराष्ट्र पोस्टल सर्कल अंतर्गत डिव्हिजन्समधील रिक्त पदे :** अहमदनगर – ६६, अकोला – ६५, अमरावती – ७३, औरंगाबाद – ३७, बीड – २२, बारामती – ५४, भुसावळ – ३६, बुलढाणा – ३८, चंद्रपूर – ४१५, धुळे – ११२, गोवा – ७६, जळगाव – ५२, कोल्हापूर – ७८, कराड – ८२, मालेगाव – ६५, नागपूर ग्रामीण – २७९, नांदेड – ५२, नाशिक – २१, नवी मुंबई – ५०, उस्मानाबाद – ९२, पालघर – ७८, परभणी – ५७, पुणे ग्रामीण – १२२, रायगड – १५२, सातारा – ७४, श्रीरामपूर – ६२, ठाणे – ७६, वर्धा – ५९, यवतमाळ – ११९, रत्नागिरी – २१६, सांगली – ११०, पुणे शहर पश्चिम – ६, पुणे शहर पूर्व – २१, पंढरपूर – ६६, फटर इट ऊठ मिरज – २, फटर छ ऊठ भुसावळ – २, सिंधुदुर्ग – १०३, सोलापूर – ४९, मुंबई शहर उत्तर पश्चिम – १०, मुंबई शहर दक्षिण – १, नागपूर शहर– ५.


# अनुकंपा भरतीची विशेष मोहीम राबविण्या यावी, जिल्ह्यातील अनुकंपधारकांचे पालकमंत्र्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती** – अमरावती जिल्ह्यातील अनुकंपाधारक गेल्या १० ते १२ वर्षांपासून अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहोत. संदर्भीय शासन निर्णय नुसार अनुकंपाधारक यांना सरळसेवेच्या कोटयातील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २० टक्के पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे तीन वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०१.०१.२०२२ ते दि. ३१.१२.२०२४ पर्यंत वाढविण्यात आली होती. परंतू, सदरच्या शासन निर्णन नुसार अनुकंपा नियुक्ती १ किंवा २ अनुकंपाधारक यांना नियुक्ती मिळत आहे. त्यामुळे कार्यालयीन प्रतिक्षासूची यादी व जिल्हा स्थरावर प्रतिक्षासूची यादी मधील अनुकंपाधारक यांची संख्या ही वाढतच जात आहे. त्यामुळे अनुकंपा भरतीची विशेष मोहीम राबविण्या यावी अश्या मागणीचे निवेदन

जिल्ह्यातील अनुकंपधारकांनी आज चंद्रकांतदादा पाटील यांना निवेदन देण्यात आले.

सदरच्या शासन निर्णयनुसार दर वर्षी शेकडोच संख्येत अनुकंपाधारक वयोमर्यादितुन बाद होत आहेत सदरच्या शासन निर्णय नुसार वयोमर्यादा ओलांडल्यामुळे नियुक्तीपासून वंचित राहत आहेत.त्यामुळे अनुकंपा नियुक्ती योजनेचा उद्देश देखिल सफल होत नाही आहे. सद्यस्थितीत शासनाकडे



उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार मार्च–२०२२ अखेर महाराष्ट्र मध्ये वर्ग क– ५,४८६ व वर्ग ड ३,२४४ असे एकूण ८,७३० उमेदवार प्रतिक्षासूचीवर आहेत. सदर शासना कडे डिसेंबर, २०२० च्या अखेरी सरळसेवेने भरावण्याची फक्त वर्ग– क व वर्ग– ड ची मिळून एकूण १,०४,८२३ पदे रिक्त आहेत. सदर पदे ही एकूण रिक्त पदांच्या फक्त ८% असल्याचे दिसून येते तसेच भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये ७५,००० इतक्या पद भरतीची शासनाने घोषणा केली होती. यामध्ये अनुकंपा उमेदवारांना एक वेळची विशेषबाब म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याचा प्रस्तावास मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे अनुकंपा भरतीची विशेष मोहीम राबविण्या यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १६ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण




# चिखलदरा पर्यटनस्थळाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणार - पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती,**

महाबळेश्वरच्या धर्तीवर चिखलदरा या निसर्गरम्य थंड हवेच्या ठिकाणाचे पर्यटनाच्या दृष्टीने देशभरात नावलौकीक व्हावे तसेच या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या नवीनतम संधी उपलब्ध होण्यासाठी जिल्हा नियोजन योजना व सी.एस.आर. फंड मधून निधी उपलब्ध करुन देणार, असे आश्वासन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले.

चिखलदरा तालुक्यातील 'आमझरी निसर्ग पर्यटन संकुल' व खटकाली येथील 'प्रकाश होम स्टे'ला पालकमंत्र्यांनी आज भेट देऊन साहसी खेळ चालविणाऱ्या युवक व युवतींशी रोजगार, कामकाज व साहसी खेळ प्रशिक्षणाबाबत चर्चा केली. त्याप्रसंगी ते बोलत होते.माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण) श्री. लुनावत, वन विभागाचे अधिकारी व महसूल विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले की, आमझरी येथील निसर्ग पर्यटन संकुलात स्थानिक २० युवक-युवतीव्दारे साहसी खेळ चालविण्यात येत असून





त्यांना साधारणतः १० हजार रुपये मानधन दिल्या जाते. अशाच पध्दतीने स्थानिकांना त्यांच्या राहत्या ठिकाणी रोजगार उपलब्ध व्हावा, यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत. त्यासाठी नैसर्गिक संसाधनाच्या माध्यमातून येथे उत्पादीत होणारे विशेष उत्पादन, तृणधान्य, खपली गहू, मध, खवा, मोहफुलावर प्रक्रीया करुन उत्पादन निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात यावे. यासाठी जिल्हा प्रशासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल. आमझरी हे गाव मधाचे गाव म्हणून ओळखले जाते. त्यामुळे मधापासून निर्माण होणारे विविध उत्पादन तयार करुन विपणन केंद्र निर्माण करण्यात यावे. या अशा अनेक उपक्रमांमुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊन मेळघाटातील ग्रामीण क्षेत्राचा विकास साधला जाईल, असेही पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी खटकाली येथील प्रकाश जाम्भेकर यांच्या 'प्रकाश होम स्टे' ला पालकमंत्र्यांनी भेट देऊन पाहणी केली. होम स्टे ला येणाऱ्या पर्यटकांसाठी निवास, भोजन व्यवस्था आदी संदर्भात त्यांनी माहिती जाणून घेतली. तेथील




कॉफी प्रकल्प व उत्पादनाची माहिती त्यांनी जाणून घेतली. यावेळी शहापूर येथील खादी व ग्रामोद्योग आयोगाव्दारे पुरस्कृत शिवस्फुर्ती प्रक्रीया फाउंडेशनला पालकमंत्र्यांनी भेट देऊन पाहणी केली.

चिखलदरा तालुक्यातील

## पालकमंत्र्यांची चिखलदरा ग्रामीण रुग्णालयास भेट

दरम्यान यावेळी पालकमत्र्यांनी चिखलदरा ग्रामीण रुग्णालयाला भेट देवून वैद्यकीय सोयी- सुविधांचा आढावा घेतला. हतरु गावात आलेल्या कॉलरा साथीच्या रुग्णांच्या प्रकृती विषयी त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

हतरु येथे काही दिवसापूर्वी कॉलराची साथ पसरली होती. त्यावर आरोग्य विभागाने तात्काळ दखल घेत, गावातील रुग्णांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात भरती करुन उपचार सुरु केले होते. भरती झालेल्या रुग्णांपैकी दहा रुग्णांची प्रकृती सुधारली असून त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. तसेच उर्वरित रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी यांनी यावेळी दिली.-

# उद्या १७ ऑगस्ट रोजी दवाखाने राहणार बंद ; २४ तास डॉक्टर जाणार संपावर

## IMA ची देशव्यापी बंदची हाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई** - कोलकात्यात आरजी कर मेडिकल कॉलेजात महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणामुळे संपूर्ण देश हादरला आहे. या घटनेच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने(खच-) १७ ऑगस्ट रोजी देशव्यापी संप पुकारला आहे. तसेच आयएमएने रुग्णालये सेफ झोन म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे देशातील वैद्यकीय सेवेवर याचा मोठा परिणाम दिसून येणार आहे. तसेच आजपासून देशभरातील डॉक्टरांकडून आंदोलन तीव्र करण्याचे संकेत देण्यात आले आहे.

आयएमएने एक पत्रक काढून १७ ऑगस्ट रोजी बंद पुकारण्यात येत असल्याचं जाहीर केलं आहे. त्यामुळे सर्व दवाखाने, क्लिनिक्स, ओपीडीच्या सेवा १७ ऑगस्ट सकाळी ६ ते १८ ऑगस्ट सकाळी ६ वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहेत. मात्र, अत्यावश्यक सेवा सुरू राहणार आहेत. तब्बल २४ तास सेवा बंद राहणार आहे. या दरम्यान अत्यावश्यत सेवा सुरू राहणार आहे. आयसीयू, अपघात विभाग आणि प्रसूतीसेवाही सुरू ठेवण्यात येणार असल्याचं आयएमएने स्पष्ट केलं आहे. अत्यावश्यक आरोग्य सेवा, अतिदक्षता कक्ष, सीसीयू, अत्यावश्यक शस्त्रक्रिया सुरु राहणार आहेत.

**२४ तासांत खासगी रूग्णालयांमध्ये केवळ आपत्कालीन सेवाच सुरु**

शनिवारी सकाळी ६ ते




रविवारी सकाळी ६ या २४ तासांत फक्त खासगी रूग्णालयांमध्ये केवळ आपत्कालीन सेवाच सुरू राहणार असल्याची माहिती आयएमएने दिली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन एकजुटीने या संपामध्ये उतरणार आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा कायदा करण्याच्या मागणीसाठी देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी कायदा आणला पाहिजे. जवळपास २५ राज्यांमध्ये डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी कायदे असले, तरी ते त्याची अंमबजावणी होताना दिसत नाही. हॉस्पिटलमध्ये ५० टक्के महिला डॉक्टर असतील तर महिलांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे.

कोलकात्यात आरजी कर मेडिकल कॉलेजात महिला डॉक्टरवरील बलात्कार हत्या प्रकरणाचा तपास आता सीबीआयकडे सोपवण्यात आलाय. हायकोर्टाने हा तपास सीबीआयकडे देण्याचे आदेश दिले होते. सध्या कोलकाता शहरात तणावाची स्थिती आहे.

## पीडित महिला डॉक्टरच्या अंगावर अनेक ठिकाणी जखमा

बलात्कारानंतर हत्या करण्यात आलेल्या महिला डॉक्टरचे शवविच्छेदन करण्यात आले आहे. यातून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्याचा दावा केला जातोय. मृत डॉक्टरशी अनेकवेळा बळजबरीने शरीससंबंध ठेवण्यात आल्याचा दावा केला जातोय. पहाटे ३ ते ५ वाजेदरम्यान महिलेसोबत हा प्रकार घडला आहे. बलात्कार पीडित महिला डॉक्टरच्या अंगावर अनेक ठिकाणी जखमा आहेत. या महिलेच्या ओठांवर, नाकावर, गाल, जबडा तसेच शरीरावर अनेक ठिकाणी जखमा आहेत. या डॉक्टरच्या डोक्यालाही मार आहे. इंडिया टुडेच्या रिपोर्टनुसार पीडित डॉक्टरचे तोंड बंद करण्यात आले होते.

# राज्यात विजेच्या मागणीत 3 हजार मेगावॉटची वाढ

## पावसाने उसंत घेतल्याने वाढली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर :** राज्यातील काही भागात पावसाने उसंती दिली आहे. त्यामुळे पंधरा दिवसांपूर्वीच्या तुलनेत आताची स्थिती बघितल्यास विजेच्या मागणीत तब्बल ३ हजार मेगावॉटने वाढ झाली आहे. त्यामुळे बंद करावे लागलेले वीजनिर्मिती संच पुन्हा सुरू झाले आहे. दरम्यान पुन्हा पावसचा अंदाज असल्याने आता विजेच्या मागणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.राज्यात ३० जुलैच्या दुपारी १.३० वाजताच्या सुमारास विजेची मागणी १९ हजार ८३२ मेगावॉट होती. या काळात सतत पडणाऱ्या पावसाने वातानुकूलित यंत्र, कुलर, पंखे, कृषी पंपासह विद्युत उपकरणांचा वापर कमी झाल्याचा हा परिणाम होता. काही दिवसांपासून विदर्भाच्या काही भागासह राज्यातील इतरही काही भागात पावसाने उसंत दिली आहे. त्यामुळे बुधवारी (१४ ऑगस्ट) राज्यात विजेची मागणी दुपारी २.०८ वाजता २२ हजार ८६२ मेगावॉट नोंदवली गेली. त्यापैकी २० हजार ५८१ मेगावॉट मागणी महावितरणची होती.मुंबईची मागणी २ हजार २७० मेगावॉट होती. राज्यात कृषी पंपासह वातानुकूलित यंत्र व विद्युत उपकरणांचा वापर वाढल्याने पुन्हा विजेची मागणी वाढली आहे. एकूण मागणीच्या तुलनेत १५ हजार १२३ मेगावॉट



विजेची निर्मिती राज्यात होत होती. तर केंद्राच्या वाट्यातून राज्याला ७ हजार ७४० मेगावॉट वीज मिळत होती. राज्यात सर्वाधिक ८ हजार ३६६ मेगावॉट वीजनिर्मिती महानिर्मितीकडून होत होती. त्यात औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील ६ हजार ११० मेगावॉट, उरण गॅस प्रकल्पातील ३६३ मेगावॉट, जलविद्युत प्रकल्पातील १ हजार ८८३ मेगावॉट वीज निर्मितीचा समावेश होता. तर खासगी प्रकल्पांपैकी अदानीकडून २ हजार ८९१ मेगावॅट, जिंदलकडून ८५६ मेगावॅट, आयडियलकडून १ मेगावॅट, रतन इंडियाकडून ६३४ मेगावॅट, एसडब्ल्यूपीजीएलकडून ३४३ मेगावॅट वीजनिर्मिती होत होती. या वृत्ताला महावितरण व महानिर्मितीच्या अधिकाऱ्यांनी नाव न टाकण्याच्या अटीवर दुजोरा दिला. एप्रिल महिन्यात सर्वोच्च मागणीची नोंद महावितरणकडून यंदाच्या उन्हाळ्यात १७ एप्रिल २०२४ रोजी सर्वाधिक २५ हजार ६८ मेगावॅट विजेची मागणी नोंदवली गेली. तर २७ फेब्रुवारीला २५ हजार २३ मेगावॅट, २७ मार्चला २५ हजार ३५ मेगावॅट, १९ एप्रिलला २४ हजार ८०५ मेगावॅट, २२ मे रोजी २४ हजार ६०४ मेगावॅट, ३ जूनला २४ हजार ४४३ मेगावॅट विजेची मागणी नोंदवली गेली. परंतु आता ही मागणी कमी झाली आहे. तर अधून- मधून एक- दोन दिवस पाऊस लांबल्यास पून्हा मागणीमध्ये वाढही नोंदवली जात असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात.

# स्वातंत्र्यदिनाची सुट्टी बेतली जीवावर

## दोन बुडाले, तर एक बचावला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ वर्धा** - गुरुवारी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी सुट्टी असल्याने अनेकांनी मौजमजा करण्याची संधी घेतली. तसेच या घटनेत झाले. येथील तीन मित्रांनी कामाला सुट्टी म्हणून नदीवर आंघोळ करण्याचा बेत आखला. मात्र दुर्दैव आडवे आले.

उत्तर प्रदेश येथून काही लोकं वर्ध्यात पीओपीचे काम करण्यास आले आहे. येथील कारला चौकात ते भाड्याने घर करीत राहू लागले. आज सुट्टी असल्याने कोणीही कामावर गेले नाही. त्यापैकी आठ मित्र पवनार येथील धाम नदी पात्रावर आंघोळ करण्यास गेले. यातील तिघांनी नदीत उड्या घेतल्या. जुमय खान, नासिर खान व रेहान खान हे नदीत उतरल्यावर यापैकी जुमय खान व नासिर खान यांना पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज आला नाही. ते पाण्यात दूरवर वाहून गेले. तर रेहान खान हा थोडक्यात वाचला. या घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यावर चमू घटनास्थळी पोहोचली. आपत्ती व्यवस्थापनाची चमू नदीत वाहून गेलेल्या दोघांचा शोध घेत आहे. उशिरा प्राप्त माहितीनुसार बुडालेल्या दोघांपैकी एकाचा मृतदेह हाती लागला आहे.


# 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना' सायबर गुन्हेगारांचे टार्गेट

## सावध व्हा, अन्यथा बँक खाते होईल रिकामे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर :** गेल्या काही महिन्यांपासून सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या शक्कल लढवून अनेकांची फसवणूक करीत आहेत. मात्र, आता 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना'ला सायबर गुन्हेगारांनी टार्गेट केले आहे. अर्जाची लिंक पाठवून माहिती भरण्यास सांगितल्या जात असून बँक खाते रिकामे केले जात असल्याचे काही प्रकार समोर आले आहे.

सध्या राज्यात 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजने'चे वारे सुरु आहे. अनेक महिला या योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव करीत आहेत. अनेकींनी माहेरी जाऊन कागदपत्र गोळा केले आहेत. अर्ज भरण्यासाठी शासकीय केंद्रावर महिलांची गर्दी उसळत आहे. मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर काही दिवसांतच अनेक महिलांनी 'ऑनलाईन' आणि 'ऑफलाईन' अर्ज भरला. मात्र, बऱ्याच महिलांचे अर्ज अजुनही 'पेंडिंग' दाखवत आहेत तर अनेक महिलांनी अद्याप अर्ज भरला नाही. अशा महिला अर्ज भरण्यासाठी धावपळ करीत आहेत.

> 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना' किंवा अन्य शासकीय योजनेसंदर्भात सायबर गुन्हेगार बनावट संकेतस्थळ आणि बनावट लिंक समाजमाध्यमांवर प्रसारित करीत आहेत. अशा लिंक आणि संकेतस्थळापासून सावध राहा. कुणाची फसवणूक झाल्यास सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करा. -
> **अमित डोळस,** ठाणेदार, साबयर पोलीस ठाणे, नागपूर.



महिलांच्या याच स्थितीचा गैरफायदा सायबर गुन्हेगारांनी उचलला असून फेसबुक, इंस्टाग्राम, टेलीग्राम आणि व्हॉट्सअॅपवर 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना'च्या नावावर बनावट लिंक, संकेतस्थळ टाकत आहेत. त्या लिंकमधील अर्जात महिलांची माहिती भरण्यास सांगण्यात येत आहेत. बँक खात्याचा तपशील मिळाल्यानंतर सायबर गुन्हेगार महिलांच्या खात्यातून परस्पर पैसे काढून फसवणूक करीत असल्याच्या अनेक तक्रारी राज्यभरातून समोर आल्या आहेत. लिंकवर क्लिक केल्यानंतर सायबर गुन्हेगारांकडे सर्वच माहिती जात असून अन्य फसवणुकीसाठी अर्जातील माहितीचा गैरवापर करण्यात येत आहे.

## खात्यात पैसे टाकण्याचे आमिष

समाजमाध्यमांवर लिंक टाकून सायबर गुन्हेगार मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरण्यास प्रोत्साहन देत आहेत. त्यात मुख्यमंत्र्यांच्या छायाचित्राचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे अनेकांचा लिंकवरील अर्जावर विश्वास बसतो. अर्ज भरल्यानंतर बँक खात्यात पैसे टाकण्याचे आमिष सायबर गुन्हेगार देतात. त्या आमिषाला अनेक महिला बळी पडतात. बँक खात्यातून असलेली रक्कम परस्पर लंपास केली जाते.

# जिल्हास्तरीय रानभाजी व मिलेट्स महोत्सवाचा पालकमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## सेंद्रीय शेतीमुळे शेतकरी व ग्राहक दोघांनाही लाभ -पालकमंत्री चंद्रकांत(दादा) पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती,** भारत हा कृषी प्रधान देश असून येथील आर्थिक विकास हा शेती व शेतीपूरक व्यवसायावर आजही अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीव्यवसायाला बळकट केल्याशिवाय सर्वांगिण आर्थिक विकास होणे शक्य नाही. ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लाभ दिल्या जात आहे. शेतकऱ्यांनी संघटित होऊन शेतामध्ये विविध वाण्याच्या व प्रजातीच्या पिकांचे प्रयोग करावे. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून सकस व पौष्टिक वाण ग्राहकांना पुरविल्यास शेतकरी व ग्राहक या दोघांनाही लाभ होईल. यामाध्यमातून ग्रामीण अर्थकारण बदलण्यास निश्चितच मदत होईल, अशा विश्वास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी गुरुवारी केले.

कृषी विभागाच्या कृषि, तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिल्हास्तरीय रानभाजी व मिलेट्स महोत्सवा'चा शुभारंभ पालकमंत्री चंद्रकांत(दादा) पाटील यांच्या हस्ते आज वलगाव येथील सिकची सभागृहात झाला, त्यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ. अनिल बोंडे, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंडे पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विभागीय कृषी सहसंचालक किसन मुळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, आत्मा प्रकल्पाचे अध्यक्ष नरेंद्र शिंगणे, प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत मस्के, वलगावचे सरपंच सुधीर उगले, बाळासाहेब यादव आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले की, उत्पादन वाढीसोबतच सुदृढ आरोग्यासाठी जैविक पिके व रानभाज्यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. अलीकडच्या काळात वाढत चाललेल्या जंक फूडच्या सवयींमुळे प्रतिकारशक्ती कमी होत असून दुर्धर आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यामुळे शहरातही कुपोषणाचे प्रमाणात वाढ होत आहे. आहारातील तृणधान्य व रानभाज्यांचे महत्त्व ओळखून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी सामूहिक शेती, आधुनिक पीक पद्धती व सेंद्रीय शेतीकडे वळावे.



नव्या पिढीला मिलेट्स व रानभाज्यांची ओळख करून देणारा हा महोत्सव महत्त्वपूर्ण आहे. हा महोत्सव मर्यादित कालावधीसाठी न ठेवता शहरातील नागरिकांना सहज उपलब्ध होईल, अशी बाजारपेठ निर्माण करावी. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन नागरिकांना आरोग्यवर्धक भाज्या व फळे सहज उपलब्ध होईल, असेही ते यावेळी म्हणाले.

गोरगरीब व शेतकऱ्यांसाठी शासन अहोरात्र काम करित असून त्यांच्यासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवित आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या 'शेतकरी सन्मान योजने'च्या माध्यमातून शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार रुपये सन्मान निधी दिल्या जात आहे. तसेच शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात बी-बियाणे, रासायनिक खते, युरिया शासनाच्या अनुदानातून कमी दरात उपलब्ध होत आहे. तसेच शेतकऱ्यांना जलयुक्त शिवारामुळे बारमाही पिक घेणे सोईचे झाले असून त्यांच्या उत्पन्नात वाढ होत आहे. अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्ती प्रसंगी शासन शेतकऱ्यांच्या नेहमी पाठीशी आहे. पीक विम्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत आहे. यासह 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजने'मुळे महिलांचे आर्थिक सशक्तीकरण होण्यास मदत होणार असून येत्या काही दिवसात त्यांच्या खात्यात दरमहा दीड हजार रुपये रक्कम जमा होणार आहे. अशा विविध योजनेच्या माध्यमातून गरजवंताना प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. यामुळे लाभार्थ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल होत असून त्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे. मेळघाटाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध असून या भागाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शेतीच्या विकासासाठी शेतकऱ्यांनी सामुहिक शेतीला प्राध्यान्य देऊन उत्पादित शेती मालाला 'मेळघाट हाट'च्या माध्यमातून बाजारपेठ निर्माण करण्यात आली आहे. तसेच मेळघाटातील आयुवेदीक औषध निर्माण, सेंद्रीय शेती, बांबू वर्गीय शेती यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष मोहिम राबवून या भागाचा सर्वागिण विकास करण्याचा मानस पालकमंत्री श्री. पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.



खासदार डॉ. बोंडे म्हणाले की, आधुनिक जीवनशैलीत आहारपद्धतीतून रानभाज्यांचे प्रमाण कमी झाले आहे. सुदृढ शरीरासाठी ऋतुनिहाय भाज्या आहारात असाव्यात. गुळवेल या भाजीमध्ये अँटी ऑक्स्डिेंटस्, टी इन्फ्लेमेट्री गुणधर्म असून रक्तपेशी वाढविण्यास ही वनौषधी मदत करते. तसेच मधुमेह, त्वचेच्या समस्या या रोगांवर अतिशय उपयुक्त आहेत. प्रत्येक रानभाज्यांमध्ये औषधी व विविध घटकांनी परिपूर्ण असून कफ-पित्तदोष, रक्त विकार, खाज, कुष्ठरोग, पोटांचे विकार यासारख्या अनेक रोगांसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे असे महोत्सव वेळोवेळी होणे आवश्यक आहे. विविध संस्थेच्या माध्यमातून रानभाज्या विक्रीसाठी जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन देण्यावर भर द्या. अशा महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी ते ग्राहक थेट विपणन साखळी निर्माण होत असल्याचे ते यावेळी म्हणाले.

### महोत्सवात मिलेट्स, पाककृती व रानभाज्यांचा समावेश

रानभाजी महोत्सवामध्ये मेळघाटसह जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील बचत गट, शेतकऱ्यांनी विविध प्रकारच्या रानभाज्यांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. या स्टॉलवर नैसर्गिकरित्या रुजलेल्या मायाळू, मटारू, राजगिरा, पुदिना, केणा, पाथरी, आघाडा, गुळवेल, ओवा, वावडिंग, शेवगा, तरोटा, तांदुळजा, बेलफळ, जिवती, कवठ, करवंद, रानकेळी, बांबू, करटुले, शतावरी, भुई आवळा, सुरण, अरबी, कमळकाकडी, कपाळफोडी, उंबर आदी ६५ प्रकारचे रानभाज्यांसोबतच कडधान्याचे ३० पेक्षा जास्त प्रकार होते. तसेच बांबूपासून बनविलेले १६ प्रकारचे विविध साहित्यही या महोत्सवामध्ये ठेवण्यात आले होते. महोत्सवामध्ये आलेल्या खवय्यांसाठीही २५ प्रकारचे विविध पाककृतीचे स्टॉल्स महोत्सवात लावण्यात आले होते. यावेळी पालकमंत्री यांनी महोत्सवात लावलेल्या विविध रानभाज्यांच्या व खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सला प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्याकडून रानभाज्यांची माहिती जाणून घेतली. यावेळी पालकमंत्र्यानी सावा खीर, अळूवळी अशा मिलेट्स व रानभाज्यांच्या खाद्यपदार्थांची चव चाखून खरेदीही केली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला रानभाजी व मिलेट्सची माहिती असलेली 'ओळख रानभाज्यांची' या घडीपत्रिका व संत्रा फळपिकांची संपूर्ण माहिती असलेले 'संत्रा उत्पादनाचे गुरुकिल्ली' या पुस्तकाचे विमोचन पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर 'जिल्हास्तरीय रानभाजी व मिलेट्स' महोत्सवाच्या आयोजन उद्देशाबाबत आत्माच्या प्रकल्प संचालिका श्रीमती निस्ताने यांनी प्रास्ताविकातून माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन व आभार पुरवठा व मुल्य साखळी तज्ज्ञ निलेश राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते फिरते मेडिकल क्लिनिकचे लोकार्पण

## फिरते मेडिकल क्लिनिकच्या माध्यमातून रुग्णांना घरपोच उपचार सुविधा उपलब्ध होईल







### पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती,-** फिरते मेडीकल क्लिनिकच्या माध्यमातून मेळघाटसह परिसरातील गरजू रुग्णांना घरपोच वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध होईल, असे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले.

आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या प्रयत्नातून उपलब्ध झालेल्या फिरते मेडिकल क्लिनिक असलेल्या मोठ्या रुग्णवाहिकेचे पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले.चांदुरबाजार तालुक्यातील कुरळपूर्णा येथील आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था अधिनस्त निवासी मूकबधिर विद्यालयाला सदिच्छा भेट प्रसंगी आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री बोलत होते.

यावेळी आमदार बच्चुभाऊ कडू, माजी आमदार प्रवीण पोटे पाटील, बोर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनचे पदाधिकारी यांचेसह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले की,मेळघाटातील अतीदुर्गम गावात रस्ते सुविधा कमी असल्याने प्राथमिक औषधोपचारासह इतर वैद्यकीय उपचार सुविधा घेण्यासाठी खूप अडचणी येतात. वैद्यकीय सुविधा मिळविण्यासाठी दूर अंतरावरच्या आरोग्य केंद्रात जावे लागते. फिरते मेडिकल क्लिनिकमुळे आजारी व्यक्तीच्या घरापर्यंत पोहोचणे शक्य होऊन वेळेत संबंधित रुग्णाला उपचार सुविधा देता येईल, असे त्यांनी सांगितले.ही फिरते मेडिकल युनिट असलेली अँबुलन्स मेळघाटातील २५ गावात वैद्यकीय सेवा पुरविणार आहे . या मोबाईल मेडिकल क्लिनिकमध्ये सर्व प्रकारच्या वैद्यकीय, रक्त चाचण्या उपलब्ध आहेत, अशी माहिती बोर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनच्या अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.यावेळी पालकमंत्र्यांनी चांदुरबाजार तालुक्यातील कुरळपूर्णा येथील आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था अधिनस्त निवासी मूकबधिर विद्यालयाला येथे सदिच्छा भेट देवून विद्यालयाची पाहणी केली.

# राज्याचा सर्वांगीण विकास व नागरिकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ मुंबई-** राज्याचा सर्वांगीण विकास व नागरिकांच्या कल्याणासाठी राज्य शासन वचनबद्ध आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी या सर्व घटकांच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून विकासाला चालना देण्याचे काम सुरू असून, विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासनाने राबविलेल्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त मंत्रालय येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते.मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती



देवेंद्रकुमार उपाध्याय, मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव यांच्यासह सैन्य दलाचे अधिकारी, वरिष्ठ पोलिस अधिकारी, स्वातंत्र्य सैनिक आणि इतर विभागांचे अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या दोन वर्षांत राज्य शासनाने भरीव कामगिरी केली आहे. विदेशी गुंतवणूक, समाजातील दुर्बल, गोरगरीबांसाठी आखलेल्या नाविन्यपूर्ण योजना या माध्यमातून नागरिकांप्रती असणारी बांधिलकी दाखवून दिली आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवून जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्यासाठी आगेकूच सुरू आहे. त्यामध्ये आपल्या राज्याचा वाटा मोठा असणार आहे. राज्याची वाटचाल त्या दिशेने सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

### परदेशी पर्यटकांची पसंती महाराष्ट्राला

राज्यातील गुंतवणूकदार, उद्योजक किंवा सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम राज्य शासनाने केले आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, कृषी, शिक्षण, ऊर्जा, निर्मिती, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, पर्यटन, आरोग्य सुविधा, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा या क्षेत्रांमध्ये आपण आमूलाग्र क्रांती आणत आहोत. राज्यात दीड कोटी रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट्य आपण ठेवले आहे. राज्याची लॉजिस्टिक पॉलिसी जाहीर केली आहे. यातून येत्या पाच वर्षांत ३० हजार कोटींचा महसूल राज्य शासनाला मिळणार आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास वाढल्याने राज्यात गुंतवणुकीचा वेग वाढला आहे.गेल्या दोन वर्षांत ५ लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणुकीसाठी करार झाले आहेत. थेट परकीय गुंतवणुकीत तर आपण देशात प्रथम आहोत. देशाच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के आहे. उद्योगात आणि सेवा क्षेत्रात आपले राज्य क्रमांक एकवर आहे. विदेशी पर्यटकांची पसंतीही महाराष्ट्र असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

# राज्यात आजपासून पुन्हा पाऊस,

## अमरावती सह संपूर्ण विदर्भात पावाची शक्यता

### हवामान खात्याचा अलर्ट

**दि.१६ अमरावती** जुलै महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यात आजपासून पुन्हा पाऊस, मराठवाडा-विदर्भातील 'या' जिल्ह्यांत कोसळणार; हवामान खात्याचा अलर्टमहाराष्ट्रात मुसळधार पाऊस झाला. अनेक जिल्ह्यांना पावसाने चांगलंच झोडपून काढलं. पण ऑगस्ट महिना सुरु होताच राज्यात पावसाने उसंत घेतली. सध्या काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी कोसळत आहेत. त्यामुळे बळीराजाने शेतीकामांना वेग दिलाय. अशातच राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे.आज शुक्रवारपासून राज्यातील काही भागात पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी कोसळण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, आजपासून पुढील चार ते पाच दिवस विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**कोणकोणत्या जिल्ह्यात कोसळणार पाऊस?-** मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव आणि परभणी जिल्ह्याला पावसाचा इशारा देण्यात आलाय. विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, परतवाडा, अकोट, अचलपूर,



वर्धा, नागपूर शहरात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मुंबईसह उपनगर आणि कोकणालाही पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात पावसाचा अंदाज आहे. दुसरीकडे अहमदनगर, नाशिक नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातही रिमझिम पावसाची शक्यता आहे.

# युवा स्वाभिमान पार्टी तर्फे मोफत चष्मे व तिरंगा वाटप

## आमदार रवि राणा यांचा सेवाभावी उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती** युवा स्वाभिमान पार्टीचे युवा मोर्चा शहर अध्यक्ष मा. सुरज अनिल मिश्रा यांच्या द्वारे १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वतंत्र्य दिना निमित्य बजरंग टेकडी राजापेठ येथे झेंडावंदनाचा कार्यक्रम सुरज अनिल मिश्रा यांच्या मार्गदर्शना खाली संपन्न झाला. या कार्यक्रमास ५३ वर्षे पुर्ण होत आहे. राष्ट्रध्वजास मान वंदना देण्याची परंपरा मिश्रा परिवारांनी प्रारंभ केली होती. दरवर्षी ध्वजा रोहण करण्याचा मान बजरंग टेकड़ी वरील वेगवेगळया मान्यवरांना देण्यात




येत असतो. यावर्षी हा मान सुरज मिश्रा, शनी मडावी, आंगणवाडी सेविका यांना देण्यात येवुन त्यांच्या हस्ते ध्वजा रोहण करण्यात आले. सकाळी ठीक ७.३० वा. या कार्यक्रमास सुरवात झाली. यावेळी परिसरातील २५० शालेय विद्यार्थी आपल्या शाळेचा गणवेष घालुन राष्ट्रगीत म्हणु लागले. नंतर कार्यक्रमाचे आयोजक सुरज मिश्रा यांनी विद्यार्थीयांना नोटबुक, पेन, पेन्सिल तसचे बुंदिचे लड्डु व चॉकलेटचे वाटप केले. या नंतर राजापेठ चौक येथे भव्य मंच उभारून सर्व स्वातंत्र्य सेनानी यांना हार अर्पण करून श्रद्धांजली दिली व डीजे लावून भव्य जल्लोष करण्यात आला. तसेच मा. आमदार रविभाऊ राणा यांच्या तर्फे मोफत चष्मे व तिरंगा वाटप करण्यात आले. या वेळी देवराज तिवारी, शर्मिला मिश्रा, प्रणय नरेठे, नितीन मस्के, विक्की हारे, रितिक सिंग, आकाश ठाकुर राज मिश्रा, शनि मडावी, अशोक माहुलकर, अक्षय चौधरी, विजू मडावी, हरीश खडसे, सतीश यादव, पवन चौधरी, भरत मडावी, अरुण कुकडकर, लालचंद मिश्रा, अनिल मिश्रा, संजय देशमुख, गुडवाडे ताई, वानखडे ताई, जोगी यादव, मंगेश हिवाळे, राजू मेहरा, नयन तिवसकर, रामेश्वर मिश्रा, श्याम उईके, अनिल गाते, अनिल धुर्वे उपस्थित होते.

# वृद्ध कलावंतांची श्रेणी-निहाय निवड करण्याची मागणी जोर धरू लागली

## पालकमंत्री लक्ष देतील काय? सुधारित शासन निर्णय काढण्याची मागणी-कलावंत संघटनांचे शासनाकडे साकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

एकीकडे मानधन वाढ देतानाच दुसरीकडे श्रेणी काढून टाकल्याने राज्यातील वृद्ध कलावंत प्रचंड नाराज झाले आहेत. केवळ संगीत कलेवरच आपला व कुटुंबातील सदस्यांचा उदरनिर्वाह चालवणाऱ्या कलावंतांना उतार वयात आर्थिक हालअपेष्टा होऊ नये व त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये, त्यांना सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबईच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजना सन १९५४-५५ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या आरंभीपासूनच वृद्ध कलावंतांची निवड करतांना निवड समिती त्या त्या कलाकारांचा स्थानिक, जिल्हा पातळी व राज्य स्तरावरील दर्जा ठरवून अ, ब आणि क



श्रेणी कलावंत म्हणून वर्गवारी करून निवड करीत असे. मात्र, शासनाने दि.१६ मार्च २०२४ च्या नवीन शासन निर्णय-वृकमा ४३२१ (१५)/ प्र.क्र.१४५/सां.का.४ मध्ये श्रेणीचा मुद्दा गौण ठरविल्याने शासनाच्या या धोरणाबाबत कलावंतांमध्ये कमालीची उदासिनता व प्रचंड नाराजी असून निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.वाढत्या महागाईमुळे आजवर वृद्ध कलावंतांना शासनाकडून मिळणारे मासिक मानधन हे अत्यल्प असल्याने ते वाढवून देण्यात यावे, अशी मागणी अनेक संघटनांनी रेटून धरल्याने शासनाने दि.१६ मार्च २०२४ रोजी शासन निर्णय काढून हे मानधन पाच हजार रुपये केल्याबद्दल शासनाचे सर्वत्र हार्दिक अभिनंदन केले जात आहे. मात्र, या नवीन शासन निर्णयामध्ये श्रेणीच्या मुद्द्याला अचानक कलाटणी देण्यात आल्याने, गाव पातळीवर भजनादी कला सादर करणारे कलावंत आणि संगीतशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास करून व कठीण परिश्रम घेऊन आकाशवाणी आणि दूरदर्शनसारख्या प्रसार माध्यमांवर तसेच विविध राज्यांत आपली कला सादर करून केवळ कलेसाठीच जीवन समर्पित करणारे कलावंत एकाच श्रेणीत आणल्यास हा गुणवत्ताधारक कलावंतांवर अन्याय होणार नाही काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. आणि एकूणच निवड समिती प्रक्रियेसंबंधी संभ्रम निर्माण झाला आहे.

एकीकडे मानधन वाढ देतानाच दुसरीकडे श्रेणी काढून टाकल्याने कलावंत प्रचंड नाराज झाले असल्याने यापुढेही निवड समितीद्वारा वृद्ध कलावंत निवडतांना स्थानिक, जिल्हा पातळी व राज्य स्तरावरील कलाकार यांची एकत्रित घिसाडघाई न करता, त्या त्या कलावंतांच्या योग्यतेनुसार अ, ब आणि क श्रेणी कलावंत अशी वर्गवारी ठरवून कलावंतांना सुयोग्य दर्जा व न्याय मिळवून द्यावा तसेच त्यासंबंधी तातडीने सुधारित शासन निर्णय काढावा, अशी कळकळीची मागणी जिल्ह्यातील तमाम कलावंतांकडून करण्यात येत आहे. तसे निवेदन कलावंत संघटनेतर्फे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

# तात्काळ साईनगर परिसरातील नवजलवाहिन्या जाळे पसरावा

## जलवाहिनी नवजोडणी प्रश्नावर नितीन कदम ॲक्शन मोडवर

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला नितीन कदम यांनी दिले निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

पाणीपुरवठा योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाणीपुरवठा योजनांचे प्रसार केला आहे. मनपा अमरावती क्षेत्रात बहुतेक भागामध्ये मध्ये पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहेत. परंतु नवनिर्मित वस्त्या,नगरे,व विविध परिसरात अद्यापही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे जाळे पसरायला निकामी ठरले. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उदासीन अकार्यक्षमते मुळे परिणामी पसिरातील नागरिकांना बोअरचे पाण्यावर अवलंबून रहावे लागते. व गंभीर आजारांना बळी पळावे लागते. महापालिकेत समाविष्ट परिसरात जलवाहिन्यांचे जाळे नसल्यामुळे पाणीपुरवठा करण्यास अडचण येत आहे. दरम्यान



राधा सिटी,म्हाडा कॉलनी जवळ,साई नगर येथे गेल्या कित्येक वर्षापासून नागरिक वास्तव्यात आहे. तरीही तेथील नागरिकांना अद्यापही पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. आज तिथे दाट लोकवस्ती झाली असून तेथील नागरिक बोअर चे पाणी पिण्यासाठी योग्य नसून तरीही त्या पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे तेथील नागरिकामध्ये पोटाचे विकार वाढले असून रोगराई प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळून आला आहे. प्रत्येकी एक घर वगळता दुसऱ्या घरी किडनी स्टोनचे प्रकार वाढले आहे. ही गंभीर बाब संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांच्या लक्षात येताच यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून येथील भागात तात्काळ नवजलवाहिन्या जाळे पसरावा अश्या आशयाचे निवेदन यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय,टोपे नगर,मालटेकडी अमरावती येथे देण्यात आले. यावेळी कदम यांच्यासह जि.ग्रामीण अध्यक्ष संजय चूनकीकर, दिलीप वानखडे, सुरेश मानकर, सचिन तेलमोरे, नारायण टापरे, प्रणव सहारे, नितीन ठाकरे,राजु भुंबर, सुभाष मानकर, दिलीप वानखडे, अभिनव बर्डे,विनोद मोहोड, अथर्व वाटणकर, अभिषेक सवाई, आकाश पाटील व संकल्प शेतकरी संघटनेचे सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

# साडे तेरा फुटाचा अजगर...



**टाकरखेडा संभू ते देवरी मार्गावरील अजय देशमुख यांच्या शेत शिवारात साडे तेरा फुटाचा अजगर दिसल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, यावेळी तात्काळ याची माहिती सर्पमित्र विकी पंजाबराव जोशी याला देण्यात आली, सर्पमित्राने शेत शिवार गाठून या साडे तेरा फुटाच्या अजगराला पकडले व जंगलात नेऊन सोडले ,त्यामुळे शेतकऱ्यांनी विश्वास सोडला. शेतातून अजगराला बाहेर काढण्यास रोशन देशमुख, प्रज्वल कावरे, ओम पिंगळे, प्रकाश गवई, विभू सवाई या युवकांनी मदत केली.**

**(छाया : संतोष शेंडे, टाकरखेडा संभु)**

# श्री क्षेत्र नागरवाडी येथे ७८ वा भारतीय स्वातंत्र्ता दिवस मोठ्या उत्साहात साजरा

## मेळघाट क्षेत्रातील गोरगरीब आदिवासी बांधवांना अन्नदान व वस्त्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ चांदुर बाजार**

अमरावती जिल्ह्यातील हजारो भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या, श्री गाडगे महाराज संस्था श्रीक्षेत्र नागरवाडी येथे, ७८ वा भारतीय स्वातंत्र्ता दिवस कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या विचारांना जोपासत सेवाभावी उपक्रमातून मोठ्या उत्साहात या ठिकाणी नुकताच पार पडला. याप्रसंगी विश्रोळी येथिल गाडगेबाबांचे परमभक्त, दिपकदादा देशमुख समवेत उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते ध्वजारोहण तसेच श्री बाबांच्या मुर्तीचे पुजन करण्यात आले. दरम्यान आश्रम शाळेतील मुलांनी स्वागत व देशभक्तीपर गीतांसह




कवायतीचे अतिशय सुंदर असे सादरीकरण यावेळी केले. तद्नंतर नागरवाडी इंद्रभुवनाचे विश्वकर्मा तथा संस्थेचे सर्वेसर्वा बापुसाहेब देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन केले. दरम्यान आश्रमशाळेतील १ ते १० पर्यंतच्या वर्गातून प्रथम,द्वितीय,तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारीतोषिक रक्कम देवून त्यांचा गौरव करण्यात आला. याच श्रृंखलेत मुर्तिजापुर येथिल दानशुर संजयजी डागा यांचा अभिष्टचिंतन सोहळा, आदिवासी विद्यार्थ्यांसमवेत साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेतर्फे संपुर्ण डागा परिवाराचे शाल,श्रीफळ पुष्पहार देत हृदयस्पर्शी असे स्वागत करण्यात आले. प्रामुख्याने दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील भारतीय स्वतंत्रता दिनाच्या निमीत्ताने मेळघाटक्षेत्रातील व परिसरातील सोहळ्याला उपस्थित गोरगरीब आदिवासी बांधवांना धारणी येथील युवा नेतृत्व तथा समाजसेवी रमेश तोटे यांच्या सहकार्यातून उबदार ब्लँकेट, तसेच मुंबई येथिल उदार दयाळु सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांचेकडून महिलांना सुंदर साड्या, संस्थेतर्फे आश्रम शाळेतील मुलांना सुंदर सौंदर्यप्रसाधन साहित्य टॉवेल, आदिंचे वितरण मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

सरतेशेवटी संचालक सागर देशमुख देशमुख यांनी कार्यक्रमाला उपस्थित सर्वांचे मनस्वी आभार मानले. या आनंदमय सोहळ्याला उपस्थित हजारो गोरगरीब आदिवासी बांधव तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांना मुर्तिजापुर येथिल दानशुर संजयजी डागा यांच्या वाढदिवसानिमित्त सुंदर शेव, बुंदी,रसगुल्लाचे मिष्टान्न भोजन देत कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली. प्रामुख्याने या कार्यक्रमाला दिपकदादा देशमुख, चक्रधर ठाकरे,अमोल शेळके, माजी शिक्षक एस.टी. ठाकरे,तुलाराम फुले,प्रशांत देशमुख,व्यवस्थापक वसंतराव देशमुख,मुर्तिजापुर येथिल संजयजी डागा,पुरुषोत्तमजी डागा व डागा परिवार,आदिंसह विश्रोळी,वणी,घाटलाडकी येथिल नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गावाच्या कल्याणाचा मार्ग सामुदायिक प्रार्थनेतुन जातो : डॉ नंदकीशोर काळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

सामुदायिक प्रार्थना ही प्रणाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मानवाच्या कल्याणासाठी निर्माण केली. असे प्रतिपादन प्रा.डॉ नंदकीशोर काळे यांनी केले .संत गजानन महाराज मंदीर येथे सामुदायिक प्रार्थनेच्या महत्वावर काळे बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले राष्ट्रसंत म्हणत

मित्र हो ऐका माझे वचन ।
जरी व्हावे गावाचे कल्याण
सामुदायिक प्रार्थना साधन।
सोडु नका कधीही ।।

गावाच्या कल्याणाचा मार्ग सामुदायिक प्रार्थनेतून जातो.समाज सुधारला ?गाव सुधारले असे आपण केव्हा म्हणू ?केवळ भौतिक प्रगती म्हणजे समाज सुधारणा नाही. जीवनात आनंद आणि शांती असणे म्हणजे कल्याण होय. आध्यात्मिक उन्नती करणाच जीवनाचा उद्देश आहे असे गौतम बुध्द तर ज्ञानप्राप्ती हाच जीवनाचा उद्देश आहे असे स्वामी विवेकानंद म्हणतात. आध्यात्मिक उन्नती आणि ज्ञानप्राप्ती हा विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या



सामुदायिक प्रार्थनेत आपल्याला प्रकर्षाने जाणवतो. वारकरी संप्रदायाने भक्तिमार्गाचा प्रसार केला व तो समाजामध्ये रुजविण्यासाठी वैध्यवमार्गी लोक सक्रिय झाले. राष्ट्रसंताच्या सामुदायिक प्रार्थनेमध्ये भक्तीमार्ग आहे. समाजातील विविध पंथ, संप्रदायातील लोकांनी एकत्र येवून प्रभुत्त्वाला प्राप्त करण्यासाठी केलेली प्रार्थना म्हणजे सामुदायिक प्रार्थना आहे. प्रार्थनेमध्ये सर्व धर्मांच्या समन्वयाचा विचार आहे ते लोकसुधारनेचे विद्यालय आहे असे राष्ट्रसंत म्हणतात. एवढेच नव्हे तर सामुदायिक प्रार्थनेतून विश्वशांती प्रस्थापित होते असा विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मांडतात. ना हम रहे अपने दिये, हमको सत्री से गर्ज है। म्हणजे केवळ एका व्यक्तीचे कल्याण महत्वाचे नसुन समाजातल्या सगळ्या घटकाच्या कल्याणाचा विचार महाराजानी मांडला सामुदयिक प्रार्थनेच्या वेळी केले जाणाऱ्या नामस्मरणाने चित्ताची एकाग्रता वाढून वाणीची शुध्दता होते असे ते म्हणाले.

# महाराष्ट्रात काँग्रेसकडे एक नेतृत्व नाही, निवडणुकीत चेहरा लादता येत नाही : संजय राऊत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**

निवडणुकीत चेहरा लादता येत नाही. लोक चेहरा ठरवतात. हा आमचा नेता आहे. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचं नेतृत्व आहे पण ते एक नाही. महाराष्ट्रात काँग्रेसचे अनेक नेते, त्यात काही माजी मुख्यमंत्री, मंत्रिपदावर काम केलेले नेते आहेत. प्रत्येकाला मुख्यमंत्री बनण्याची आशा असेल पण तो त्यांचा प्रश्न आहे. त्यांच्याकडे असा काही चेहरा असेल, मुख्यमंत्रिपदाचं नंतर पाहू पण तो त्यांनी जाहीर केला पाहिजे असं विधान करत संजय राऊतांनी केलं आहे.

संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे हा आमच्यासाठी चेहरा आहेत. तो सांगायला कशाला हवा, तो आहेच. ३ पक्षाच्या संसदीय समितीची बैठक बोलवावी याची मला गरज वाटत नाही. राज्याचे मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेंनी जे काम केले त्यामुळे ते आपोआप महाराष्ट्राचा चेहरा झाला. ठाकरे २ होऊ शकते. भविष्यात काय होईल हे येणारा काळ ठरवेल. मविआचे प्रमुख नेते उद्धव ठाकरेच आहेत. अर्थात शरद पवार, राहुल गांधी हेही आहेत. राष्ट्रवादीत शरद पवार हे सर्वोच्च नेते आहेत. आमच्याकडे उद्धव ठाकरे सर्वोच्च नेते आहेत तसं राज्यात काँग्रेसकडे नेतृत्व आहे पण एक चेहरा नाही असं त्यांनी सांगितले. टीव्ही ९ च्या मुलाखतीत ते बोलत होते.

त्याशिवाय काही स्वतंत्र





पक्षाचे नेते प्रमुख चेहरा असू शकतात. युती-आघाडीचा प्रमुख चेहरा असू शकतो. महायुतीकडे कोण चेहरा हे सांगू शकतात का? ३ पक्षाचे सरकार आहे. मुख्यमंत्री आहेत परंतु माझ्या चेहर्यावर निवडणूक लढवून जिंकणार आहोत असं कुणी सांगू शकत नाही. मुख्यमंत्री असलेल्या पक्षाला लढायला जागाच कमी मिळणार आहेत. त्यांना ५० जागा तरी मिळणार आहेत का? देवेंद्र फडणवीस, अजित पवार आहेत हा ३ पैशांचा तमाशा आहे. उद्धव ठाकरे हे राज्याचे मुख्यमंत्री होते. शिवसेनाप्रमुखांचे ते चिरंजीव आहेत. शिवसेनासारख्या पक्षाचे पक्षप्रमुख आहेत. ते महाविकास आघाडीचा प्रचार जीवापासून करतात. ते लोकसभेला पाहिले आहे असं संजय राऊतांनी सांगितले.

### निवडणुकीत चेहरा हवाच...

लोकसभा, विधानसभा किंबुहना महापालिका असेल एक चेहरा असतो त्यावर बरेच राजकीय परिवर्तन होत असते हा आमचा अनुभव आहे. शरद पवारांचा चेहरा होता म्हणून राष्ट्रवादीला इतक्या जागा मिळाल्या. पवार नसते तर इतक्या जागा मिळाल्या नसत्या. उद्धव ठाकरेंच्या चेहर्याकडे पाहून मतदान झाले. राहुल गांधी होते म्हणून काँग्रेसला १०० चा टप्पा पार करता आला. बिनचेहर्याचं राजकारणात, सिनेमातही हिरो लागतो ना तर तो खलनायकासमोर लढण्याची लोकांना प्रेरणा देतो त्यामुळे चेहरा हवा अशी भूमिका संजय राऊतांनी पुन्हा स्पष्ट केली.

# शहरातील भाजपच्या नेत्यांना डावलून सुलभा खोडके 'लाडकी बहीण' योजनेच्या समितीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या विधानसभा क्षेत्रनिहाय समित्यांवर भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचा वरचष्मा असताना अमरावतीत मात्र ही संधी काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके यांना मिळाल्याने राजकीय वर्तुळात त्याची चांगलीच चर्चा रंगली आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या सनियंत्रण समितीच्या अध्यक्षपदी काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीमध्ये सदस्य म्हणून अमरावतीचे तहसीलदार, महापालिका आयुक्त, दोन बाल विकास प्रकल्प अधिकारी, तसेच दोन अशासकीय सदस्य यांचा समावेश आहे. तर बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी पूर्व हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.



सुलभा खोडके यांचे पती संजय खोडके हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते आहेत. सुलभा खोडके यांच्या नियुक्तीला हा आधार असला, तरी यातून आगामी निवडणुकीच्या दृष्टीने महायुतीतील इतर घटक पक्षांना स्पष्ट संकेत मिळाले आहेत. शहरातील भाजपच्या नेत्यांना डावलून सुलभा खोडके यांची समितीच्या अध्यक्षपदी झालेली नियुक्ती त्यामुळेच चर्चेचा विषय बनली आहे.

गेल्या महिन्यात विधान परिषदेच्या ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसची सात मते फुटली. त्यात सुलभा खोडके यांच्या नावाचीही चर्चा झाली. सुलभा खोडके यांनी मात्र, मी काँग्रेससोबत आहे, काँग्रेससोबतच राहणार असून काँग्रेसलाच मतदान केल्याचे सांगत त्यांच्याबाबत सुरू असलेली चर्चा निराधार असल्याचे स्पष्ट केले होते. गेल्या काही वर्षांपासून काँग्रेसच्या स्थानिक राजकारणापासून दूर लोटण्याचे प्रयत्न सुरू असून आपले मत फुटल्याची चर्चा हा त्याच षडयंत्राचा एक भाग असल्याचा आरोपही सुलभा खोडके यांनी केला होता.

सुमारे दोन वर्षांपूर्वी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या दोन दिवसीय अमरावती दौऱ्यादरम्यान सुलभा खोडके यांना निमंत्रण नसल्याने त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. काँग्रेसच्या स्थानिक पातळीवरील बैठकांना सुलभा खोडके यांना निमंत्रित केले जात नव्हते, स्थानिक पदाधिकारी आणि नेत्यांकडून अवहेलना होत असल्याचा आरोप सुलभा खोडके यांनी त्यावेळी केला होता. बुधवारी काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या विधानसभा निवडणूक आढावा बैठकीतही सुलभा खोडके यांना निमंत्रित करण्यात आले नव्हते. त्यामुळे आता त्यांची पुढील काळातील भूमिका काय राहणार, हा प्रश्न चर्चेत आला आहे.

# बच्चू कडूंना बॅट तर आंबेडकरांना मिळाले गॅस सिलेंडर निवडणूक चिन्ह




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यातील पक्षांनी मोठी तयारी सुरू केली आहे. अनेक पक्षांनी आपापल्या मतदारसंघात सभा, दौरे सुरू आहेत अशातच आता प्रहार पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ति पक्षाला निवडणूक आयोगाने बॅट हे चिन्ह दिलेले आहे त्यामुळे आगामी निवडणुकीत बच्चू कडू बॅट या नव्या चिन्हाने निवडणुकीच्या रिंगणात उतरून नक्कीच चौकार,षटकार मारणार यात काहीही शंका नाही तर बाळासाहेब आंबेडकर यांच्या

वंचित बहुजन आघाडीला निवडणूक आयोगाने चिन्ह दिलं आहे. महाराष्ट्र विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडी हे गॅस सिलेंडर या नव्या चिन्हाने मैदानात उतरणार आहेत. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीसाठी वंचितला गॅस सिलेंडर दिले आहे.

## आतुरता गणरायाच्या आगमनाची.....

# नवनीत राणा पोहचल्या कुंभारवाड्यात मूर्तिकारांसोबत साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**



लहानापासून ते ज्येष्ठापर्यंत सर्वांचा आवडता लाडका बाप्पाच्या आगमनाची तयारी शहर आणि जिल्ह्यात जोरदार सुरू झाली आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपला असून विविध भागातील गणेश मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते कामाला लागले आहेत. तर दुसरीकडे मुर्तीशाळेतही गणेशाच्या मुर्तीवर अंतिम हात फिरवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्याचबरोबर गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या साहित्यांनीही बाजारपेठ सजायला सुरुवात झाली आहे.दरवर्षी प्रमाणे यंदाच्या गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते तयारी करत आहेत. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे नियोजनही करण्यात येत आहे.आज अमरावती शहरातील कुंभारवाडा परिसरात नवनीत राणा यांनी फेरफटका मारत मूर्तिकारांची चौकशी केली यावेळी एका मूर्तिकाराच्या घरात बसून स्प्रे पेंटिंग ने बाप्पाला कलर देण्याचे काम केले.

# पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे स्वातंत्र्य दीन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे ७८ वा स्वातंत्र्य दीन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आले.

देशाला विकासाकडे नेणे हे आपले कर्तव्य आहे. आजचा दिवस आपल्याला राष्ट्राप्रती असलेल्या आपल्या जबाबदार्या समजून घेण्यास आणि वचनबद्ध होण्याची प्रेरणा देतो. आपल्या देशाचे उज्ज्वल आणि समृद्ध भविष्य सुनिश्चित करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र काम केले पाहिजे आपल्या राष्ट्राला सर्वोच्च जागतिक स्तरावर नेण्यासाठी एकत्र येऊन आपल्या देशाला अभिमानाचे प्रतिक बनविण्याचे काम आपण सर्वांनी करूया. असे प्रतिपादन यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी केले

यावेळी प्रकाशजी पुंड, एड. प्रविणजी मोहोड, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, डीन , विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सुप्रसिद्ध समाजसेविका कांता रमेश काळे भारत गौरव पुरस्काराने सन्मानित

## भारत गौरव समारोह समिती नवी दिल्लीच्या वतीने कोल्हापूर येथे पुरस्कार प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रातील अग्रणी नाव म्हणजे सौ कांता रमेश काळे,गेल्या अनेक वर्षापासून त्या विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण,बचत गट,तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवून आपले सामाजिक कर्तव्य निभावत आहेत,त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेवून पूर्वी अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे



स्वातंत्र्यदिनाच्या पावन पर्वावर नवी दिल्ली येथील भारत गौरव सन्मान समारोह समितीच्या वतीने कोल्हापूर इंजिनीरिंग असोशिएशन सभागृहात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला,यावेळी कारगिल योद्धा राजेंद्र पाटील, महाराष्ट्र शासकीय पनरनियुक्त माजी सैनिक संघटनेचे राज्य सचिव श्री संजय मेटील, ऑर्गनायझिंग सेक्रेटरी अनिल माळवी,डॉ स्मिता गिरी आदी मान्यवरांचे हस्ते सौ कांता रमेश काळे यांना सन्मानित करण्यात आले.

आमदार रवी राणा यांचे खाजगी सचिव अविनाश काळे यांच्या सौ कांता रमेश काळे या मातोश्री असून त्यांच्या या यशाबद्दल आमदार रवी राणा,माजी खासदार नवनीत रवी राणा यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# सकाळच्या बडनेरा-नरखेड पॅसेंजरची वेळ चुकीची

## मेमू गाडीची वेळ बदलण्याची प्रवाशांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

मुंबई व पुण्याहून बडनेरा-अमरावती रेल्वे प्रवास करणाऱ्या शेकडो सर्वसामान्य प्रवाशांना बडनेरा रेल्वे स्थानकाहून मोर्शी, वरुड व नरखेड प्रवास करण्यासाठी योग्य वेळेवर गाडी उपलब्ध नसल्याने त्याचा मानसिक, शारीरिक व आर्थिक फटका बसत असून अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याची रेल्वे प्रशासनाने दखल घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अशी सर्वत्र मागणी केली जात आहे. उल्लेखनीय असे की, बडनेरा ते नरखेड (०१३६९) ही



मेमू गाडी पहाटे ५:५० वाजता बडनेरा रेल्वे स्थानकाहून सुटते. त्यावेळी बडनेरा रेल्वे स्थानकावर अगदी शुकशुकाट असतो. वास्तविक बडनेरा रेल्वे स्थानकावर सकाळी ६:०० ते ७:३० दरम्यान विदर्भ एक्सप्रेस, पुणे-नागपूर एक्सप्रेस व अंबा एक्सप्रेस ह्या तीन गाड्या भक्कम प्रवाशी घेऊन पोहोचतात. मात्र त्यावेळी बडनेरा रेल्वे स्थानकाहून नरखेडकडे जाण्यासाठी गाडीच नसल्याने शेकडो प्रवाशांना नाइलाजाने इतर महागड्या व खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागतो. त्यामुळे बडनेरा ते नरखेड (०१३६९) ही मेमू गाडी पहाटे ५:५० वाजताऐवजी ७:३० वाजता सोडल्यास बडनेरा रेल्वे स्थानकाहून सुटणाऱ्या या गाडीला भक्कम प्रवाशी लाभेल व पर्यायाने रेल्वे प्रशासनाला अधिक आर्थिक लाभ होण्याच्या दृष्टीने बडनेरा-नरखेड या मेमू गाडीची वेळ बदलण्याची सर्वत्र मागणी केली जात आहे.

वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला परवडेल अशी सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली असली तरी काही गाड्या चुकीच्या वेळी सोडल्या जात असल्याने व पुरेशा प्रवाशांच्या अभावी रेल्वे प्रशासनाला आर्थिक फटका बसत असल्यामुळे ह्या गाडीची वेळ बदलण्याची मागणी जिल्ह्यातील शेकडो प्रवाशी करीत आहेत.

# वरुड मध्ये खा.डॉ.अनिल बोंडे च्या नेतृत्वात निघाला विशाल आक्रोश मोर्चा : बांगलादेशात हिंदू वर झालेल्या अत्याचाराचा केला निषेध



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ वरुड**

बांगलादेशात झालेल्या हिंसाचारणानंतर हिंदूवर आणि धार्मिक स्थळावर होत असलेल्या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी तसेच सर्व हिंदूना संघटीत करण्याकरिता अमरावती जिल्ह्यातील वरूड शहरात सकल हिंदू समाजाचा वतीने भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वाखाली आज हजारोच्या संख्येने भव्य हिंदू आक्रोश मोर्चा काढण्यात आला...

यावेळी विरुड शहर शुद्ध काही वेळा साठी बंद ठेवण्यात आले होते.. बांगलादेशातील हिंदू समाजाचे संरक्षण करण्याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सूचना केल्या असून त्यांच्या पाठीशी राहण्यासाठी हा मोर्चा होता, त्यासोबतच वफ कायदा, सेक्युलर सिविल कोड, ही हिंदू समाजाची भावना होती ही सुद्धा यावेळी व्यक्त करण्यात आली, अशी प्रतिक्रिया खासदार अनिल बोंडे यांनी दिली.भारताची परंपरा राहिली आहे की आपण जगाच्या उपकाराकरिता उभे राहतो. त्यामुळे आपण कधीच कोणावर आक्रमण केले नाही. जो संकटात होता त्याला मदतच केली. तो आपल्या सोबत कसा व्यवहार करतो हे बघितले नाही. जगभरातील पीडितांकरिता आपण हे करतो. सरकार हे करीत असते. शेजारील देशांमध्ये जी अस्थिरता आहे, त्यामुळे अनेकांना अराजकता झेलावी लागत आहे. त्यांना काही कष्ट सोसावे लागू नयेत, त्यांच्यावर काही अत्याचार होऊ नयेत, याची जबाबदारी एका देशाच्यानाते आपल्यावर असल्याचे बोंडे यावेळी म्हणाले.

# वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

पश्चिम बंगाल मध्ये कोलकाता येथील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचारा विरोधात संपूर्ण देशभर संताप व्यक्त केल्या जात आहे. आज अमरावती येथेही या घटनेचा निषेध करण्यात आला. डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब, फार्मासिस्ट असोसिएशन, रक्तदान समिती यासह वैद्यकीय




क्षेत्राशी निगडित अनेक संघटनांच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत कोलकाता येथील महिला डॉक्टर वर झालेल्या अत्याचार प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हातात विविध घोषणांचे फलक घेत डॉक्टर सह वैद्यकीय क्षेत्राशी निगडित कर्मचाऱ्यांच्या संवरक्षणासाठी कायदा करण्याची व कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली.कोलकात्यात आरजी कर मेडिकल कॉलेजात महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणामुळे संपूर्ण देश हादरला आहे. या घटनेच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने(खच-) १७ ऑगस्ट रोजी देशव्यापी संप पुकारला आहे. तसेच आयएमएने रुग्णालये सेफ झोन म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे देशातील वैद्यकीय सेवेवर याचा मोठा परिणाम दिसून येणार आहे. तसेच आजपासून देशभरातील डॉक्टरांकडून आंदोलन तीव्र करण्याचे संकेत देण्यात आले आहे

# धामणगावात साकारणार पहिले माजी सैनिक भवन : आ. प्रताप अडसड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ धामणगाव रेल्वे**

सैनिकांचे त्याग व बलिदान देशातील जनता कधीही विसरू शकत नाही व सैनिकांचे ऋण देखील कधीच फिटणार नाही. देशाच्या सैनिकांना निवृतीनंतर देखील अनेक अडचणी व प्रश्न असतात. या अडचणी व प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असून माजी सैनिकांच्या मागणीनुसार धामणगावात माजी सैनिक भवन उभारण्यात येणार असून निधी मंजूर करण्यात आला आहे असे मत आ प्रताप अडसड यांनी व्यक्त केले आहे येथील परसोडी रोड रस्त्यावरील माजी सैनिकांच्या



वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले यावेळी आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलेअध्यक्षस्थानी माजी सैनिक संस्थेचे संस्थापक दिलीप दगडकर, होते भाजपा विधानसभा प्रमुख रावसाहेब होते, अध्यक्ष हरीशजी मलवार, सचिव नरेश इंगळे, यांच्यासह संतोष शर्मा,पुरुषोत्तम बढीये बाबुलाल मेश्राम,वसंत भोंडे,गजानन कुंजेकर,हेमंत पडोळे, जितेंद्र मिरगे,श्रावण चव्हाण, जगदीश महाजन,प्रशांत वैरागडे,भरत चिकटे,आनंद अतळकर,दिनेश ठाकरे,सुनील राऊत, कडव ,दशरथ ठोंबरे,गजानन मोकलकर,हर्षद भेंडे,भीमराव बोडदे, सविता वैद्ययांच्यासह मोठ्या प्रमाणात माजी सैनिक व महिला मंडळ सदस्य हजर होते.